# शहीद भगतसिंगचे तरूणांना आवाहन





भगतसिंग आणि त्यांच्या क्रांतीकारक साथीदारांचे निवडक लेख

सहयोग मूल्य – रु. १५

## अनुक्रमणिका


प्रस्तावना ........ 1

ड्रीमलॅंडची प्रस्तावना ........ 4

आम्ही कशासाठी लढत आहोत ........ 11

अखेरचा संदेश ........ 18

युवक ........ 29

घराला राम राम : वडिलांच्या नावे पत्र ........ 32

विद्यार्थी आणि राजकारण ........ 33

तुरुंगातून वडिलांना पत्र ........ 36

वर्गीय हितसंबंधांचा आंदोलनावरील प्रभाव ........ 39


---

# शहीद भगतसिंगचे तरुणांना आवाहन


**प्रकाशक व मुद्रक:**
अलका जोशी,
लोकायत, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रस्ता, नळ स्टॉप जवळ, पुणे–4

**मुद्रणस्थळ:**
455, आर.एस.प्रिंटर्स, शनिवार पेठ, पुणे –30

**पुनर्मुद्रण:** मार्च 2014



**संपर्क पत्ता:**
लोकायत, सिंडिकेट बँकेसमोर,
लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, पुणे–4
(दर रविवारी सायं. 5 ते 7 या वेळेत मिटींग होते)

**संपर्क फोन:**
अभिजित अ.मी. 94223 08125 अलका जोशी 94223 19129

**Website** www.lokayat.org.in
**Email** lokayat.india@gmail.com


**प्रस्तावित सहयोग मूल्य: रु. 15/-**

## आमची इतर काही प्रकाशने


| | |
|---|---|
| ये दिल मांगे मौत (कोक-पेप्सी भारत छोडो) | रु. ५/- |
| देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे | रु. ५/- |
| वित्तीय क्षेत्र लिलावात | रु. ५/- |
| मी नास्तिक का आहेः शहीद भगतसिंग | रु. ५/- |
| आरशातील राक्षसः अरुंधती रॉयचे तीन लेख | रु. १०/- |
| लढा वॉलमार्टशी | रु. १०/- |
| वॉलमार्ट भगाओ, खुदरा क्षेत्र बचाओ | रु. १०/- |
| तुम्ही बेकार का ? | रु. १५/- |
| शिक्षणाची राखरांगोळी | रु. १५/- |
| इरादे कर बुलंद | रु. १५/- |
| भारत पुन्हा गुलामीकडे | रु. २०/- |
| आण्विक वेडेपणा | रु. २०/- |
| उठ माणसाः गाणी संघर्षाची | रु. ३०/- |
| जागतिकीकरण की नवी गुलामगिरी | रु.१५०/- |
| Kick Out Dow, Save Pune | Rs. 5/- |
| Unite to Reclaim the Judiciary | Rs. 7/- |
| Resist the Silent Emergency | Rs. 10/- |
| Fight FDI in retail | Rs. 10/- |
| Palestine, Israel and the Arab-Israeli Conflict | Rs. 10/- |
| The Crisis of Global Warming | Rs . 15/- |
| Yeh Dil Mange Maut! Coke-Pepsi Quit India! | Rs . 15/- |
| India Becoming a Colony Again | Rs. 20/- |
| Unite, to Fight Nuclear Madness! | Rs. 20/- |
| Globalisation or Recolonisation? | Rs. 150/- |
| Nuclear Energy: Technology From Hell | Rs. 295/- |

# प्रस्तावना

देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यात सर्वात तेजस्वी नाव आहे–शहीद भगतसिंग. २३ मार्च १९३१ या दिवशी वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भगतसिंग हसत हसत फासावर चढला होता.

शहीद भगतसिंग आणि त्याचा प्रिय नारा 'इन्किलाब झिंदाबाद' आजही अन्याय, जुलूम, शोषण याविरुद्ध लढणाऱ्या तरुणांच्या मनात उत्साह जागवतो. देशभक्ती, आत्मबलिदान आणि स्पष्ट विचार यांचा मूर्तिमंत आदर्श म्हणजे भगतसिंग. आजही भारतातील प्रत्येक तरुण हृदयामध्ये भगतसिंग आणि त्याच्या सहकाऱ्यांना अत्युच्च प्रेमादराचे स्थान आहे.

भगतसिंगाचे हौतात्म्य आणि अतुलनीय त्याग यांची कथा तर सर्वश्रुत आहे. मात्र त्याचे क्रांतीबद्दलचे विचार फार लोकांना माहीत नाहीत. हे विचार आजच्या स्वतंत्र भारतातील शोषक सत्ताधाऱ्यांसाठीही धोकादायक आहेत त्यामुळे त्यांना दडपून ठेवण्याचाच प्रयत्न केला जातो. परंतु ज्यांना आपल्या मातृभूमीबद्दल प्रेम आहे, ज्यांना अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढायचे आहे, त्यांनी भगतसिंगचे विचार जाणून घेणे अत्यावश्यक आहे. भगतसिंग म्हणाला होता, "क्रांतीची तलवार विचारांच्या सहाणेवर परजली जाते." म्हणूनच भगतसिंगचे क्रांतीबद्दलचे विचार जाणून घेऊन ते अंमलात आणण्याची गरज आहे.

मित्रांनो, तुमच्या आजूबाजूला डोळे उघडून पाहा. भगतसिंगने देशाचे जे वर्णन त्याकाळी केले होते, आजही ते तितकेच सत्य नाही का? तो म्हणाला होता, ''भारत देश साम्राज्यवाद्यांच्या जोखडाखाली पिचत आहे. कष्टकरी वर्गाचे आज भयानक हाल होत आहेत. त्याच्यापुढे दोन संकटे आहेत–परकीय आणि देशांतर्गत भांडवलाच्या हल्ल्याची. ते दोघेही हातमिळवणी करून हल्ला करत आहेत."

आजच्या देशाच्या परिस्थितीचा विचार करा मित्रांनो, सरकार सर्व प्रकारच्या कल्याणकारी सुविधा काढून घेत आहे. सरकारी इस्पितळे महाग झाल्यामुळे आता गरिबांना तडफडत मरण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. चांगला अभ्यास करून इंजिनिअर किंवा डॉक्टर बनण्याची स्वप्नं आजचा गरीब विद्यार्थी पाहू शकत नाही. सरकारी कॉलेजमध्येही मोठ्या प्रमाणात फी वाढ झाली आहे. शिक्षणसंस्था लाखो रुपये देऊ शकणाऱ्या अनिवासी भारतीयांपुढे लाळ घोटत आहेत.

दुसरीकडे बेकारीने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. रिकाम्या जागा भरणे तर सोडाच, उलट मोठ्या प्रमाणात नोकर कपात करण्यात येत आहे. छोटे उद्योग बंद पडत आहेत. शेतीमालाला भाव मिळत नाही. येणारा प्रत्येक दिवस नवे संकट घेऊन येत आहे आणि केवळ कसेबसे जगत राहाण्याच्या आंतरिक इच्छेनेच फक्त प्रत्येक माणूस जगत आहे.



हे सारे का होतेय? कोण करतेय? पाश्चात्य प्रगत देशांच्या औद्योगिक विकासाचे सारे फायदे इथे घरबसल्या उच्चवर्गांना हवे आहेत. त्यासाठी संपूर्ण समाजाच्या सर्वांगीण विकासाची लांबवरची खडतर वाट चोखाळण्याची त्यांची मुळीच तयारी नाही. त्यांना झटपट फायदे हवे आहेत. त्यासाठी देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीसकट सारे गहाण टाकून व सारे मनुष्यबळ गुलामीत लोटून परक्या साम्राज्यशहांच्या ताब्यात ते देशाची सबंध व्यवस्था देऊन टाकत आहेत. भगतसिंगनी दिलेला इशारा दुःखदपणे खरा होताना दिसतो आहे–परकीय व देशी भांडवलाचा मिळून हल्ला–देशहितावरच हल्ला.

मित्रांनो, आज भगतसिंगाच्या बलिदानाला ७५ वर्षे होऊन गेली. भारताला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे होऊन गेली आणि आज पुन्हा एकदा आपला देश गुलामीमध्ये ढकलला गेल्याचे दृश्य दिसते आहे आणि हे कृष्णकृत्य करणारे आपल्याच देशाचे सत्ताधारी आहेत. आपल्या स्वार्थासाठी त्यांनी देशाच्या अस्मितेचा सौदा केला आहे. १०० कोटी लोकसंख्येचा, हजारो वर्षांची समृद्ध परंपरा असणारा, क्रांतिकारी विचारांचा वारसा लाभलेला आपला देश साम्राज्यवादी देशांनी आणि त्यांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी कवडीमोल किंमतीत विकत घेतला आहे.

भगतसिंगचे स्वप्नं, कोट्यवधी भारतीयांचे खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचे स्वप्नं धुळीला मिळाले आहे.

तरुण मित्रांनो, मुळापासून क्रांतिकारक बदल केल्याखेरीज ही परिस्थिती बदलणार नाहीये. या मानवद्रोही व्यवस्थेची मुळे फार खोलवर गेलेली आहेत. त्यांना संपूर्ण उखडून टाकण्यासाठी खूप मोठी ताकद गोळा करायला हवी, संघटित ताकद! पण आज आपली क्रांतिकारी ताकद विखरून पडलेली आहे, सुस्त! इतिहासात कधी कधी असा काळ येतो जेव्हा क्रांतिकारी शक्ती आपल्या क्षमता न ओळखून विखरून पडलेल्या असतात. अधोगतीचा काळ! अशा काळाबद्दल भगतसिंगने म्हटलेय, "ही परिस्थिती बदलण्यासाठी क्रांतीचे स्वप्न पुन्हा उभे करायला हवे, म्हणजे साऱ्या समाजाचा आत्मा खडबडून जागा होईल." आणि अशी खळबळ समाजातला तरुण वर्गच निर्माण करू शकतो. इतिहासाला नेहमी नवयुवकांनीच दिशा दिली आहे. भगतसिंगाने स्पष्ट शब्दात लिहिलेय, "जगाच्या इतिहासाची पाने उघडून पहा. युवकांच्या रक्ताने लिहिलेले अमर संदेश आढळतील! जगातल्या सगळ्या क्रांत्यांची, स्वातंत्र्य युध्दांची वर्णने पहा, त्यात केवळ ते युवकच भेटतील, ज्यांना बुद्धिवंतांनी माथेफिरू, वाट चुकलेले म्हणून हिणवले आहे. पण जे सुरक्षित किल्ल्यात बसले आहेत त्यांना काय कळणार किल्ल्याच्या खंदकावर स्वतःच्या शरीराचे पूल तयार करणारे जपानी युवक कोणत्या पोलादापासून बनले होते?" आज आपल्याला आपली ताकद ओळखण्याची गरज आहे. आपण आता वरवर जसे दिसतो तसे नाही आहोत. एक उद्देश्यहीन तरुण अधःपतनाच्या अंधाऱ्या दरीत कोसळू शकतो, परंतु जर समोर स्पष्ट उद्देश असेल तर तोच युवक बाकीच्यांना खंदक पार करता यावा

म्हणून स्वत:च्या शरीराचा पूल बनवायला मागेपुढे पाहणार नाही. शासकवर्गाच्या लाख प्रयत्नांनंतरही आज आम्हा तरुणांच्या हृदयात भगतसिंगच्या बलिदानाचा वारसा जिवंत आहे. आपल्याला तो वारसा ओळखायचा आहे. आपल्यामध्ये एक ज्वालामुखी दडलेला आहे. तो आपल्याला जागा करायचा आहे. विश्वास बाळगा, जेव्हा हे सारे छोटे छोटे जागृत ज्वालामुखी एका मोठया ज्वालामुखीमध्ये रूपांतरित होतील, त्या दिवशी त्याच्या उठावाने दिल्लीपासून वॉशिंग्टनपर्यंतची सारी सरकारे वितळून जातील. भगतसिंग म्हणाला होता, "जे सरकार जनतेला तिच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित करेल, ते सरकार बदलून किंवा उलथवून टाकणे हा त्या देशातल्या युवकांचा अधिकारच नव्हे तर कर्तव्यही आहे."

पुढच्या काही पानांमध्ये भगतसिंगच्या विचारांमधला तो प्रबळ झंझावात लपला आहे, जो कितीही शक्तिशाली सरकारलाही मुळापासून उखडून टाकू शकेल. आजच्या व्यवस्थेचे समर्थकही हे जाणतात. भगतसिंगला शिक्षा फर्मावताना मिंडल्टन म्हणाला होता की "त्याच्या क्रांतिकारी विचारांचा प्रसार होणे थांबवण्यासाठी मी त्याला आजीवन कैदेची शिक्षा सुनावत आहे." स्वातंत्र्यानंतरही शासकवर्गाने कायम भगतसिंगचे विचार दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. फाशीनंतरही, स्वातंत्र्य मिळाल्यावरही भगतसिंग आजीवन कैदेची शिक्षाच अजूनही एका अर्थाने भोगतो आहे. म्हणूनच ही सारी कट-कारस्थाने उघडी पाडणे हे आपले पहिले कर्तव्य आहे. भगतसिंगचे विचार, त्याची स्वप्नं आपण समजून घेऊ आणि ती देशातल्या प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवू.

भगतसिंगाच्या शब्दांत "नवयुवकांना क्रांतीचा हा संदेश घेऊन देशातल्या कानाकोपऱ्यात पोहोचायला हवे. फॅक्टरी-कारखान्यांमध्ये, झोपडपट्ट्यांमध्ये, खेड्यापाड्यात राहणाऱ्या कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचून क्रांतीचा नारा जागवायला हवा."

आम्ही या विचारांना प्रसारित करण्याची सुरुवात केली आहे. आम्हाला भगतसिंगवर नि:स्सीम प्रेम करणाऱ्या प्रत्येक साहसी तरुणाला आमच्याबरोबर घेऊन जायचे आहे. भगतसिंगनेच म्हटले होते, "देशाचे भविष्य नवयुवकांच्याच हातात आहे. तेच या धरतीचे सुपुत्र आहेत. दु:ख सहन करण्याची त्यांची तयारी, त्यांचा पराक्रम आणि असीम त्याग हेच दाखवतात की भारताचे भविष्य त्यांच्या हातात सुरक्षित आहे."

आज आम्ही या पुस्तिकेत भगतसिंगचे काही लेख दिले आहे, ते वर्तमान परिस्थिती समजून घेऊन ती बदलण्याची इच्छा असणाऱ्या नवयुवकांच्या हातातील मशाल बनले तर तेच आमच्या ह्या छोट्याश्या प्रयत्नांचे सार्थक असेल.

२५ नोव्हेंबर २००८

***



## 'ड्रीमलॅंड' ची प्रस्तावना

*(लाला रामशरण दास हे प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक होते. लाहोर षडयंत्र केस मध्ये फसवून त्यांना ५ वर्षाची शिक्षा झाली होती. तुरुंगात असतानाच त्यांनी 'ड्रीमलॅंड' हा कवितासंग्रह लिहिला आणि भगतसिंगला त्याची प्रस्तावना लिहावयास सांगितले. भगतसिंगने लाहोर तुरुंगामध्ये १५ जानेवारी, १९३१ ला ही प्रस्तावना लिहिली. ह्या लेखावरून भगतसिंगची साहित्यिक संवेदना व समजदारी दिसून येते.)*

माझे थोर मित्र रामशरण दास यांनी त्यांच्या 'ड्रीमलॅंड' या कविता संग्रहासाठी मला प्रस्तावना लिहावयास सांगितले आहे. मी कवी किंवा साहित्यिक नाही, तसेच वृत्तपत्रकार किंवा टीकाकारही नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारे त्यांनी माझ्याकडून केलेली ही मागणी योग्य नाही. पण मी ज्या परिस्थितीत सध्या आहे, तिच्यात मला लेखकाशी याबद्दल सविस्तर चर्चा करण्याची व वाद घालण्याची संधी मिळणे शक्य नाही. त्यामुळे अखेर माझ्या परममित्राची इच्छा पूर्ण करण्याशिवाय मला गत्यंतर उरलेले नाही.

मी कवी नसल्यामुळे त्या दृष्टिकोनातून मी या पुस्तकाची चर्चा करणार नाही. मला वृत्तछंदांचे कणभरही ज्ञान नाही आणि त्या मोजपट्टीने मोजल्यास ह्या कविता बरोबर आहेत का नाहीत हे ही मला ठाऊक नाही. मी साहित्यिक नसल्यामुळे त्या लिखाणाचे राष्ट्रीय साहित्यातले उचित स्थान निश्चित करण्याच्या दृष्टीनेही मी चर्चा करणार नाही.

मी राजकीय कार्यकर्ता असल्यामुळे मी फक्त त्याच दृष्टिकोनातून या पुस्तकाची चर्चा करू शकेन. परंतु इथेही एका गोष्टीमुळे हे काम प्रत्यक्षात अशक्य किंवा निदान भलतेच कठीण बनले आहे. लेखकाच्या आशयाशी सहमत असलेल्या माणसाने प्रस्तावना लिहावी असा सर्वसाधारण प्रघात आहे. पण येथे तसे मुळीच एकमत नाही. बऱ्याच मूलभूत महत्त्वाच्या मुद्यांवर माझी मते त्याच्याहून भिन्न आहेत याची त्याला जाणीव होती. त्यामुळे 'ड्रीमलॅंड' वर जे मी लिहिणार आहे ती त्याची प्रस्तावना होऊ शकत नाही. जास्तीत जास्त त्या पुस्तकावरील ही एक टीका होऊ शकेल आणि तिचे स्थान खरे म्हणजे पुस्तकाच्या शेवटी हवे, सुरुवातीला नव्हे.

राजकारणाच्या क्षेत्रात 'ड्रीमलॅंड' चे स्थान फार महत्त्वाचे आहे. सध्याच्या एकंदर परिस्थितीत चळवळीतील एक महत्त्वाची त्रुटी या पुस्तकाने भरून निघत आहे. खरे पाहिले तर आधुनिक इतिहासात आत्तापर्यंत महत्त्वाच्या भूमिका गाजवलेल्या आपल्या देशातल्या सर्व राजकीय चळवळींना एक निश्चित आदर्श, ज्यासाठी धडपडायचे असे पक्के उद्दिष्ट नव्हते. क्रांतिकारी चळवळ ही सुद्धा याला अपवाद नाही. बरेच प्रयत्न करूनही मला असा एकही क्रांतिकारी पक्ष सापडला नाही की ज्याला आपण कशासाठी लढतो आहोत याची स्पष्ट कल्पना आहे. गदर पक्ष हा त्याला अपवाद आहे. अमेरिकन धाटणीच्या राज्यव्यवस्थेपासून स्फूर्ती घेतलेला हा

पक्ष स्पष्टपणे असे म्हणतो की सध्याच्या सरकारऐवजी प्रजासत्ताक पद्धतीचे सरकार आणणे हे आमचे उद्दिष्ट आहे. बाकी सर्व पक्षातल्या लोकांना एकच ठाऊक आहे. परकीय सत्तेविरुद्ध लढणे. हा विचार अगदी स्तुत्य असला तरी त्याला क्रांतिकारक विचार म्हणता येणार नाही. **आपण हे स्पष्ट करायला पाहिजे की क्रांती म्हणजे केवळ एखादा उठाव किंवा रक्तरंजित लढा नव्हे. अस्तित्वात असलेली परिस्थिती (म्हणजे राजवट) संपूर्ण नष्ट करून त्या जागी नव्या आणि जास्त सुयोग्य पायावर आधारित अशा समाजाच्या पद्धतशीर पुनर्रचनेसाठी आखलेला कार्यक्रम हा क्रांतीमध्ये अभिप्रेत असणे आवश्यक आहे.**

राजकीय क्षेत्रात नेमस्तांना सध्याच्याच सरकारच्या छत्राखाली काही सुधारणा हव्या आहेत. जहालांची त्याहून किंचित जास्त मागणी आहे आणि त्यासाठी जहाल मार्ग वापरण्याची त्यांची तयारी आहे. क्रांतिकारकांमध्ये परकीय सत्ता उलथून टाकणे या एकाच ध्येयाने आत्यंतिक मार्ग अनुसरावा या मताचे लोक नेहमीच जास्त राहिले आहेत. त्या मार्गांनी जबरीने काही सुधारणा पदरात पाडून घेणे हे देखील काहींना पसंत होते यात शंका नाही. अशा सर्व चळवळींना खऱ्या अर्थी क्रांतिकारक चळवळी म्हणणे योग्य ठरणार नाही.

रामशरण दास हा १९०८ साली फरारी झालेल्या एका बंगाली माणसाने, औपचारिकपणे पंजाबमध्ये भरती केलेला पहिला क्रांतिकारक. तेव्हापासून त्याचा क्रांतिकारक चळवळींशी सतत संबंध होता आणि शेवटी तो गदर पक्षात सामील झाला होता. परंतु चळवळीच्या ध्येय–उद्दिष्टांबाबत त्याच्या कल्पना जुन्याच राहिलेल्या होत्या आणि या सर्व घटनांच्या सौंदर्यात व मूल्यात भर टाकणारी आणखी एक गोष्ट सुद्धा आहे. १९१५ साली रामशरण दास यांना फाशीची शिक्षा झाली होती, परंतु नंतर ती कमी करून जन्मठेपेची केली. आज मी या फाशीच्या कैद्यांच्या कोठडीत बसलो असताना जन्मठेप ही मृत्यूदंडापेक्षाही फार अधिक कठोर शिक्षा आहे याची मला अधिकारवाणीने वाचकांना जाणीव करून द्यावीशी वाटते. रामशरण दास यांना प्रत्यक्षात चौदा वर्षांची कैद भोगावी लागली. दक्षिणेकडील कोणत्या तरी तुरूंगात त्यांनी हे काव्य लिहिले. लेखकाची त्यावेळची मानसिकता आणि मनातली द्वंद्वे यांची छाप त्या काव्यावर उमटली आहे आणि त्यामुळे ते अधिकच सुंदर व लक्षवेधक बनले आहे. हे लिहिण्याचा निर्णय घेण्यापूर्वी तो निराश मनस्थितीशी बराच काळ झगडत होता. त्या काळात त्याच्या बऱ्याच सहकाऱ्यांची चांगल्या वर्तणुकीचे जबाब देऊन मुक्तता झाली होती. इतरांना आणि त्यालासुद्धा हा एक प्रचंड मोह होता. बायका–मुलांच्या सुखदु:खाच्या आठवणींनी सुटकेच्या या तळमळीत आणखी भर घातली होती. अशा वेळी या मनोधैर्य खच्ची करणाऱ्या गोष्टीविरुद्ध त्याला झगडा द्यावा लागला आणि या लेखनावर लक्ष केंद्रित करावे लागले. म्हणूनच पुस्तकाच्या पहिल्याच परिच्छेदात याचा उद्रेक आपल्याला आढळतो .



*'बायको, मुले, मित्र मला घेरतात*
*विळखा घालणारे विषारी सर्प बनून.'*

सुरुवातीला तो तत्त्वज्ञानाची चर्चा करतो. हे तत्त्वज्ञान म्हणजे बंगाल व पंजाबमधील सर्व क्रांतिकारक चळवळीचा कणा आहे, या मुद्यावर माझे त्याच्याशी तीव्र मतभेद आहेत. त्याच्या मते विश्व हे मूलत: अधिभौतिक आहे व त्यामध्ये एक गर्भित हेतू आहे; तर मी भौतिकवादी आहे आणि विश्वाचा अर्थ मी कार्यकारण भावाच्या आधारे लावतो. तथापि त्याची मते त्याच्याभोवतीच्या वातावरणाशी जुळणारी आहेत. आपल्या देशात प्रचलित असलेल्या सर्वसाधारण कल्पना ह्या त्याने मांडलेल्या कल्पनांशी जास्त मिळत्याजुळत्या आहेत. पुस्तकाचा सुरुवातीचा सबंध भाग हा ईश्वर, त्याची स्तुती, त्याची व्याख्या आणि ईश्वराच्या ठायी असलेली श्रद्धा यांना वाहिलेला आहे. हे सर्व गूढवादाचे फळ आहे आणि निराश मनोवस्थेचा तो एक नैसर्गिक परिणाम आहे. हे उघड आहे की त्या निराशामय मानसिक स्थितीला टक्कर देण्यासाठी त्याला प्रार्थनेचा आश्रय घ्यावा लागत होता. हे जग 'माया' किंवा 'मिथ्या' आहे. स्वप्नं किंवा भ्रम आहे हे मत जुन्या काळच्या शंकराचार्य व इतर हिंदू ऋषींनी निर्माण व विकसित केलेला गूढवादच आहे. परंतु भौतिकवादी तत्त्वज्ञानात या प्रकारच्या विचारसरणीला अजिबात स्थान नाही. तरीही लेखकाचा हा गूढवाद कोणत्याही प्रकारे निंद्य किंवा शोचनीय नाही. त्याला अंगभूत असे सौंदर्य लाभलेले आहे. त्यातल्या कल्पना प्रेरक आहेत. आता हेच पहा–

*तू हो एक पायाचा दगड अनामिक*
*अन् वागव उल्हासाने स्वत:च्या वक्षावर*
*ते विराट आणि प्रचंड वास्तुशिल्प,*
*यातना सोसण्यामध्येच शोध खरी मुक्ती.*
*नको करू हेवा चकाकत्या कळसाच्या दगडाचा*
*ज्याच्यावर बरसतात या जगाकडून स्तुतिसुमने .... इत्यादी*

माझ्या स्वत:च्या अनुभववरून मी निर्धोकपणे असे म्हणू शकतो की गुप्त कार्यामध्ये 'न आशा न भीती' बाळगता, माणूस जेव्हा जीव धोक्यात घालत असतो, बेवारशीपणे, सन्मानविरहित, शोकगीताशिवाय येणाऱ्या मरणाला सदैव तयार असतो, तेव्हा वैयक्तिक मोह आणि इच्छा यांच्याशी झगडायला त्याला गूढवादाचे सहाय्य घ्यावे लागते आणि ह्या प्रकारचा गूढवाद हा नीतीधैर्य टिकवायला मदत करतो. पुढे तो क्रांतिकारकांच्या मानसिकतेविषयी लिहितो. अनेक हिंसक कृत्यांना जबाबदार असलेल्या क्रांतिकारी पक्षाचा रामशरण दास हा सभासद होता. पण यावरून क्रांतिकारक हे विनाशात आनंद लाभणारे रक्तपिपासू राक्षस आहेत असे सिद्ध होत नाही. हे वाचा–

*गरज पडली तर हो क्रूर बाह्यत:*
*पण हृदयात असू देत सदैव तुझ्या कोमलता*
*फुत्कार गरज पडली तर, परंतु दंश नको करू*
*प्रेम वसू दे तुझ्या हृदयात अन् बाहेर युद्ध कर.....इत्यादी*

रचनेसाठी विनाश हा केवळ आवश्यक नसून अनिवार्य आहे. कार्यक्रमाचा एक आवश्यक भाग म्हणून क्रांतिकारकांनी त्याचा स्वीकार केलाच पाहिजे. वरील ओळीत हिंसा व अहिंसाविषयक तत्त्वज्ञान सुंदरपणे मांडलेले आहे. लेनिन एकदा गोर्कीला म्हणाला होता की, "सर्व संवेदना हेलावून सोडणारे आणि कलावंताच्या मस्तकावर थोपटावे अशी इच्छा निर्माण करणारे संगीत मी ऐकू शकलो नाही"; नंतर तो म्हणाला, "परंतु डोक्यावर थोपटण्याचा हा काळ नव्हे. सर्व प्रकारच्या हिंसेचे उच्चाटन करणे हे आपले अंतिम उद्दिष्ट असले तरी आज कवट्या फोडून टाकणारे प्रहार करण्यासाठी हात उठले पाहिजेत." आत्यंतिक गरजेच्या वेळी जेव्हा हिंसेचा अवलंब करण्याची वेळ येते तेव्हा क्रांतिकारकांना अंतर्यामी काय वाटते याचे हे एक उदाहरण आहे.

यानंतर लेखक निरनिराळ्या परस्परविरोधी अशा धर्मांच्या प्रश्नाला हात घालतो. सगळे राष्ट्रवादी जसा प्रयत्न करतात त्याचप्रमाणे तोही सर्वधर्मसमन्वय करण्याचा प्रयत्न करतो. हा प्रश्न हाताळण्याची त्याची पद्धत फारच लांबलचक व पाल्हाळिक आहे. मी कार्ल मार्क्सच्या एकाच वाक्याने या प्रश्नाचा निकाल लावला असता: *धर्म ही जनसमुदायांसाठी अफू आहे.*

आपण सर्वजण जो समाज निर्माण करण्यासाठी तळमळत आहोत, त्या भावी समाजाचे विवेचन या काव्यसंग्रहाच्या शेवटच्या भागात केलेले आहे आणि ते सर्वात महत्त्वाचे आहे. पण आरंभीच मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो. 'ड्रीमलँड' हे खरोखरीच एक मनोराज्य (यूटोपिया) आहे. लेखकाने सरळपणे ते मथळ्यातच मान्य केले आहे. 'ड्रीमलँड' या मथळयातूनच ते स्पष्ट होते. पण सामाजिक विकासात मनोराज्येसुद्धा निःशंकपणे महत्त्वाची कामगिरी बजावतात. सेंट सायमन, फोरीअर, रॉबर्ट ओवेन आणि त्यांच्या स्वप्नाळू विचारधारा नसत्या तर शास्त्रीय मार्क्सवादी समाजवादही अस्तित्वात आला नसता. रामशरण दास यांच्या मनोराज्याचे स्थान तेच आहे. जेव्हा आमच्या कार्यामध्ये चळवळीच्या तत्त्वज्ञानाचे सुसूत्रीकरण करणे आणि चळवळीला शास्त्रीय दृष्टिकोनाचा पाया प्राप्त करून देणे या गोष्टींचे महत्त्व पटेल तेव्हाच या पुस्तकांचा कार्यकर्त्यांना उपयोग होईल.

मला असे आढळले की विचार मांडण्याची लेखकाची पद्धत ढोबळ आहे. लेखक त्याच्या मनोराज्यात गुंतलेला असतानाही सध्याच्या समाजातील कल्पनांनी त्याची पाठ सोडलेली नाही. उदा.'ज्यांना गरज असेल त्यांना भिक्षा दिली जाईल.'



आम्ही उभारू इच्छितो त्या साम्यवादी समाजात आम्ही धर्मादाय संस्था उभारणार नाही. त्यामध्ये गरजू व गरीब कुणी नसेल, भिक्षा देणे व भिक्षा घेणे असले काहीच नसेल. हा दोष असून देखील त्याने हा प्रश्न अतिशय सुरेख हाताळला आहे.

त्याने चर्चिलेली सर्वसाधारण रूपरेषा ही शास्त्रीय समाजवादाशी तंतोतंत जुळणारी आहे. परंतु विरोध करावा, निषेध करावा किंवा अगदी काटेकोरपणे बोलायचे तर दुरुस्त करावयात अशा काही गोष्टी येथे आढळतात. उदाहरणार्थ, ४२७ व्या कडव्याच्या तळटीपेत तो लिहितो की सार्वजनिक (सरकारी) नोकरांनी त्यांचा स्वतःचा चरितार्थ चालवण्यासाठी रोज चार तास शेतावर किंवा कारखान्यात काम करावे. पण हे पुन्हा स्वप्नरंजनपर आणि अव्यवहार्य आहे. आज या सेवकांना अनावश्यकपणे लठ्ठ पगार दिला जातो, या सध्याच्या प्रथेचा तिटकारा म्हणून बहुधा हा निष्कर्ष निघाला असेल. वस्तुस्थिती अशी आहे की अगदी बोल्शेविकांनासुद्धा हे मान्य करावे लागले की मानसिक श्रम हे शारीरिक श्रमांइतकेच उत्पादक श्रम आहेत आणि भावी समाजात जेव्हा निरनिराळ्या घटकांतील नाती ही समानतेच्या पायावर आधारलेली असतील, तेव्हा उत्पादक आणि वितरक यांना समान महत्त्वाचे गणले जाईल. एखाद्या खलाशाने आपल्या चरितार्थासाठी रोजचे चार तास श्रम करण्यासाठी दर चोवीस तासांनी जहाज थांबवून किनारा गाठावा, किंवा शेतावरचे काम पूर्ण करण्यासाठी शास्त्रज्ञाने प्रयोगशाळेतील प्रयोगकार्य बंद ठेवावे अशी अपेक्षा तुम्ही करू शकत नाही. दोघेही जण चांगले उत्पादक श्रम करत असतात. फरक एवढाच राहील की समाजवादी समाजात मानसिक श्रम करणाऱ्यांना शारीरिक कष्टाची कामे करणाऱ्यांपेक्षा कोणत्याही प्रकारे श्रेष्ठ मानले जाणार नाही.

रामशरण दास यांची मोफत शिक्षणाची कल्पना खरोखरीच विचार करण्याजोगी आहे आणि रशियामध्ये समाजवादी सरकारने साधारणपणे तशीच योजना अंगिकारलेली आहे.

गुन्हेगारांबद्दल त्याने केलेली चर्चा ही खरोखरच सर्वात प्रगत विचारधारा आहे. गुन्हा ही सर्वात गंभीर सामाजिक समस्या आहे आणि ती फार कौशल्याने हाताळली गेली पाहिजे. लेखक आयुष्याचा बराचसा काळ तुरुंगात होता. त्याला प्रत्यक्ष अनुभव आहे. एके ठिकाणी तो 'हलकी मजुरी, मध्यम मजुरी व सक्तमजुरी' ही अगदी तुरुंगातील खास भाषा वापरतो. बदला घेण्यासाठी शिक्षा देण्याऐवजी गुन्हेगारात सुधारणा घडवून आणणारी कृती हा शिक्षेचा पाया असला पाहिजे असे इतर समाजवाद्यांप्रमाणे लेखक सुचवतो. शिक्षा देणे नव्हे तर गुन्हेगाराला सुधारून परत आपल्यात आणणे हे न्यायदानाच्या अंमलबजावणीचे मार्गदर्शक तत्त्व असले पाहिजे. तुरुंग हे आजच्यासारखे नरक नसावेत, ती सुधारगृहे असायला पाहिजेत. या संबंधाने वाचकांनी रशियन कारागृहांची व्यवस्था अभ्यासायला पाहिजे.

लष्कराविषयी लिहिताना तो युद्धाचीही चर्चा करतो. समाजवादी समाजात युद्धाला कारणीभूत होणारे भिन्न व परस्परविरोधी हितसंबंध नसल्यामुळे त्या

काळी 'युद्ध' हा विषय विश्वकोशात फक्त काही पाने व्यापेल आणि युद्धसामुग्री ही वस्तुसंग्रहालयातील गॅलऱ्या सजवतील.

आपण जास्तीत जास्त असे म्हणू शकू की युद्धे ही 'स्थित्यंतराच्या काळात आवश्यक अशी गोष्ट' या स्वरूपात राहतील. आजच्या रशियाचे उदाहरण आपण घेतले तर हे सहज समजून येईल. तिथे सध्या कामगारांची सर्वाधिकारशाही आहे. त्यांना समाजवादी समाज स्थापन करायचा आहे. पण त्याचबरोबर भांडवलदारी समाजाकडून स्वत:चा बचाव करण्यासाठी त्यांना लष्कर ठेवावे लागते. परंतु युद्धाचे हेतू मात्र वेगळे असतील. आमच्या 'ड्रीमलँड'मधील लोकांना साम्राज्यवादी प्रेरणा युद्ध पुकारण्यास उद्युक्त करणार नाहीत. युद्धात जिंकून घेतलेले प्रदेश तेथे नसतील. दुसऱ्या देशातल्या बांडगुळी सत्ताधाऱ्यांना सिंहासनावरून खाली खेचून जनसमुदायाचे रक्तशोषण थांबवण्यासाठी आणि गांजवणुकीतून त्यांना मुक्त करण्यासाठी क्रांतिकारक सेना परदेशात जातील; तेथल्या लोकांवर सत्ता गाजवणे, त्यांची लूटमार करणे हा त्यांचा हेतू नसेल. आमच्या सैनिकांना लढण्यासाठी चेतना आणण्याकरता आदिमानवाला शोभेल अशी राष्ट्रीय किंवा वांशिक द्वेष भावना वापरण्याची गरज तेथे नसेल.

विश्वसंघ हा मुक्तपणे विचार करणाऱ्या सर्व लोकांचे सर्वात लोकप्रिय आणि निकडीचे उद्दिष्ट आहे. लेखकाने हा विषय नीट विस्तृतपणे मांडला आहे. त्याची तथाकथित 'लीग ऑफ नेशन्स' वरची टीकाही उत्तम आहे.

५७१ (५७२) कडव्याच्या तळटीपेत लेखक थोडक्यात क्रांतीच्या मार्गाचा परामर्श घेतो. तो म्हणतो, "निव्वळ हिंसक क्रांतीने अशा प्रकारचे राज्य आणता येत नाही. समाजवाद बाहेरूनही समाजावर लादता येत नाही. असे राज्य समाजाच्या आतूनच उमलायला हवे. वर सांगितल्याप्रमाणे जनसमुदायांना शिक्षण देऊन, उत्क्रांतीच्या संथ प्रक्रियेद्वारा अशी राजवट आणावी लागेल" वगैरे. या विधानात तशी काही चूक नाही. ते अगदी बरोबर आहे. परंतु जर नीट स्पष्ट केले नाही तर त्यामुळे गैरसमज किंवा आणखी वाईट म्हणजे गोंधळ माजण्याची शक्यता आहे. यातून असा निष्कर्ष निघतो का की रामशरण दासला बळाच्या वापरावरील निष्ठेची निरर्थकता कळून चुकली होती? तो कर्मठ अहिंसावादी बनला आहे का? नाही, त्याचा तसा अर्थ नाही.

वर उल्लेखिलेल्या विधानाचा प्रत्यक्षात अर्थ काय होतो हे मला स्पष्ट करू दे. इतर कोणापेक्षाही क्रांतिकारक हे जास्त चांगले जाणतात की हिंसक पद्धतीने समाजवादी समाज आणता येत नाही आणि त्याची वाढ व विकास समाजाच्या अंतर्यामातूनच व्हायला हवा. शिक्षण हेच उपयोगात आणण्याजोगे एकमेव हत्यार आहे असे लेखक सुचवतो. परंतु कोणाच्याही सहज ध्यानात येईल की सध्याचे सरकार, किंबहुना सर्वच भांडवलशाही सरकारे अशा प्रकारच्या कोणत्याही प्रयत्नाला पाठिंबा देणार नाहीत, उलट तो निर्घृणपणे दडपून टाकतील. तर मग लेखक सांगतो



त्या 'उत्क्रांती'ची निष्पत्ती काय होणार? आम्ही क्रांतिकारक आमच्या हाती सत्ता आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत. आम्ही प्रथम क्रांतिकारी सरकार संघटित करू व नंतर हे सरकार जनसमुदायांच्या शिक्षणासाठी सर्व साधनसंपत्तीचा वापर करील. रशियात आज हेच घडत आहे. एकदा सत्ता हस्तगत केल्यावर रचनात्मक कार्यासाठी शांततामय मार्ग अवलंबिले जातील. अडथळे दूर करण्यापुरताच बळाचा वापर केला जाईल. लेखकाला जर हेच म्हणायचे असेल तर मी त्याच्याशी सहमत आहे आणि मला असा विश्वास आहे की लेखकाला नेमके हेच म्हणायचे आहे.

मी पुस्तकाविषयी बरेच सविस्तर विवेचन केले आहे. किंबहुना त्यावर टीकाच केली आहे. पण मी त्यात काही बदल करावा असे मुळीच सुचविणार नाही, कारण त्याला एक ऐतिहासिक मूल्य आहे. १९१४–१५ या काळातील क्रांतिकारकांच्या ह्याच कल्पना होत्या.

ह्या पुस्तकाची मी विशेषकरून तरूणांसाठी जोरदार शिफारस करतो; परंतु एका इशाऱ्यासहित. अंधानुकरण करण्यासाठी किंवा त्यात जे लिहिले आहे तेच प्रमाण मानण्यासाठी कृपया ते वाचू नका. ते वाचा, त्याची समीक्षा करा, त्यावर चिंतन करा आणि त्या आधारे तुम्ही तुमची स्वत:ची मते बनवा.

*('मागोवा'' प्रकाशित 'आम्ही कशासाठी लढत आहोत' मधून पुनर्मुद्रित.)*

***मित्रांनो, माझ्या विचार करण्याच्या पद्धतीमुळेच मी नास्तिक बनलो आहे. ईश्वरावर विश्वास आणि रोजची देवपूजा व प्रार्थना जिला मी माणसाचे सर्वात स्वार्थी आणि खालच्या दर्जाचे काम मानतो, ह्यामुळे मला मदत होईल, का माझी परिस्थिती आणखी बिकट होईल मला माहित नाही. सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देणाऱ्या नास्तिकांबद्दल मी वाचले आहे, म्हणूनच, अगदी वधस्तंभापर्यंतच्या अंतिम घटकेपर्यंत मी ताठ मानेने उभा राहू इच्छितो.***

- *'मी नास्तिक का आहे', या भगतसिंगच्या प्रसिद्ध लेखातून*

# आम्ही कशासाठी लढत आहोत

*(असेंब्लीमध्ये बॉम्ब फेकल्यानंतर ६ जून १९२९ रोजी दिल्लीचे सेशन जज्ज न्या. लिओनिल मिडल्टन यांच्या कोर्टात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी केलेले ऐतिहासिक निवेदन.)*

## दिल्ली कोर्टातील ऐतिहासिक जबानी

आमच्यावर गंभीर आरोप ठेवले गेले आहेत. त्यामुळे आमच्या बचावासाठी आम्ही काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. आमच्या तथाकथित गुन्ह्यांविषयी खालील प्रश्न उद्भवतात: (१) असेंब्लीत बॉम्ब फेकले गेले होते हे सत्य आहे का? आणि हे जर सत्य असेल तर ते का फेकले गेले होते? (२) खालच्या कोर्टात आमच्यावर जे आरोप ठेवले गेले आहेत ते खरे आहेत की खोटे?

पहिल्या प्रश्नाच्या पहिल्या भागाबद्दल आमचे उत्तर होकारार्थी आहे. परंतु हा प्रकार 'डोळ्यानी प्रत्यक्ष पाहणाऱ्या' साक्षीदारांनी जी साक्ष दिली आहे ती निखालस खोटी आहे. आम्ही बॉम्ब फेकल्याचे नाकारत नाही आणि म्हणूनच इथे या साक्षीदारांच्या जबान्यांचा खरेपणा पारखून पाहिला गेला पाहिजे. उदाहरणार्थ, आम्ही हे सांगू इच्छितो की आम्हा दोघांपैकी एकाजवळ पिस्तुल सापडले हे सार्जंट टेरीचे म्हणणे धडधडीत असत्य आहे; कारण आम्ही जेव्हा स्वेच्छेने स्वत:ला पोलीसांच्या स्वाधीन केले तेव्हा आम्हा दोघांपैकी कुणाजवळही मुळीच पिस्तुल नव्हते. आम्ही बॉम्ब फेकत असताना आम्हाला पाहिले असे ज्या साक्षीदारांनी सांगितले ते खोटे बोलत आहेत. न्याय आणि सचोटी यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांनी या खोट्या गोष्टींपासून धडा घेतला पाहिजे. त्याचबरोबर सरकारी वकिलांचा व्यवहार औचित्यपूर्ण होता आणि कोर्टाने आतापर्यंत आम्हाला दिलेली वागणूक न्यायाला धरून होती हे आम्ही मान्य करतो.

पहिल्या प्रश्नाच्या दुसऱ्या भागाचे उत्तर देण्यासाठी आम्हाला या बॉम्बफेकीसारख्या ऐतिहासिक घटनेचा जरा विस्तारपूर्वक परामर्श घ्यावा लागेल. आम्ही हे कृत्य कोणत्या उद्देशाने आणि कोणत्या परिस्थितीत केले याचे पूर्ण व खुल्लमखुल्ला स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

जेलमध्ये आमच्याकडे काही पोलीस अधिकारी आले होते. त्यांनी आम्हाला सांगितले की या (बॉम्ब फेकीच्या) घटनेनंतर लगेच लॉर्ड आयर्विनने संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या एकत्रित अधिवेशनात सांगितले की, 'कुणा एका विशिष्ट व्यक्तीच्या विरुद्ध केलेला हा विद्रोह नाही, तर तो संपूर्ण शासनव्यवस्थेच्या विरुद्ध केलेला विद्रोह आहे.' हे एकून आम्ही त्वरित ताडले की आमच्या या कृत्यामागील उद्दिष्ट लोकांना खऱ्या अर्थी समजून आले आहे.

मानवतेवर प्रेम करण्याच्या बाबतीत आम्ही कुणापेक्षा तसूभरही मागे नाही. आम्ही कुणाचाही व्यक्तिगत द्वेष करीत नाही. आम्ही सर्व प्राणिमात्रांकडे नेहमी आदरपूर्वक नजरेने पहात आलो आहोत. स्वत:ला सोशालिस्ट म्हणवणाऱ्या दिवाण



चमनलालने म्हटल्याप्रमाणे, रानटी वर्तनाने देशाला कलंक लावणारे उपद्रवी लोक आम्ही नाही; किंवा लाहोरच्या 'ट्रिब्यून' आणि इतर काही वर्तमानपत्रांनी आम्ही माथेफिरू आहोत असे सिद्ध करण्याचा जो प्रयत्न केला त्या प्रकारचे माथेफिरूही आम्ही नाही. स्वत:च्या देशाचा इतिहास, त्याची सद्यपरिस्थिती आणि मानवोचित आकांक्षा यांचा अभ्यास करणारे आम्ही केवळ मननशील विद्यार्थी आहोत एवढाच विनम्रतापूर्वक दावा आम्ही करू शकतो. ढोंग किंवा पाखंडीपणाचा आम्ही तिरस्कार करतो.

## एक अनर्थकारक संस्था

आम्ही हे कृत्य कोणत्याही व्यक्तिगत स्वार्थापोटी किंवा विद्वेषाच्या भावनेने केलेले नाही. ज्या शासनाच्या प्रत्येक कृतीतून त्याची अयोग्यताच नव्हे तर अपाय करण्याची क्षमतासुद्धा प्रकट होते अशा शासनसंस्थेला विरोध व्यक्त करणे एवढाच आमचा उद्देश होता. या विषयावर आम्ही जितका जास्त विचार केला तितका आमचा असा दृढविश्वास होत गेला की जगासमोर भारताच्या लज्जास्पद आणि असहाय अवस्थेची ढोल बडवून जाहिरात करणे एवढ्यासाठीच केवळ हे शासन तेथे आहे. हे शासन म्हणजे एक बेजबाबदार आणि निरंकुश सत्तेचे प्रतीक आहे.

जनतेच्या प्रतिनिधींनी कितीतरी वेळा आपल्या राष्ट्रीय मागण्या सरकारसमोर मांडल्या, परंतु त्या मागण्यांची सर्वथा अवहेलना करून सरकारने प्रत्येक वेळी त्या कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिल्या. संसदेने पास केलेल्या गंभीर ठरावांना भारताच्या तथाकथित पार्लमेंटसमोरच तिरस्कारपूर्वक पायदळी तुडवले गेले आहे. दडपणूक करणारे आणि निरंकुश कायदे रद्द करू पहाणाऱ्या ठरावांकडे नेहमीच अवहेलनेच्या नजरेने पाहिले गेले आहे. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी जे कायदे आणि ठराव लादलेले होते आणि अवैध ठरवून रद्द केले होते त्यांना केवळ लेखणीच्या फटकाऱ्याने सरकारने पुन्हा लागू केले आहे.

थोडक्यात, या शासनसंस्थेच्या चालू अस्तित्वात काय चांगले आहे हे खूप विचार करूनही आम्हाला समजू शकले नाही. ही शासनसंस्था भारतातील कोट्यवधी कष्टकऱ्यांच्या श्रमांच्या कमाईच्या आधारे जरी डामडौल करत असली तरी ती एक केवळ दिलबहलाव करणारी, पोकळ, दिखाऊ व बदमाशपणाने भरलेली अशी संस्था आहे. आमच्या सार्वजनिक नेत्यांची मनोवृत्ती समजून घेण्यासही आम्ही असमर्थ आहोत. भारताच्या असहाय पारतंत्र्याची इतक्या उघडपणे चेष्टा करण्यामध्ये आणि पूर्वनियोजित अशा दाखवेगिरीवर सार्वजनिक संपत्ती आणि वेळ खर्च करण्यामध्ये आमची नेतेमंडळी सहाय्य का करतात ते आम्हाला कळू शकत नाही.

आम्ही या समस्यांबद्दल आणि कामगार आंदोलनाच्या नेत्यांच्या धरपकडीबद्दल विचार करत होतो, इतक्यात ट्रेड्स डिस्प्यूट बिल घेऊन सरकार सामोरे आले. याच संबंधात असेंब्लीमधील कामकाज पाहण्यासाठी आम्ही गेलो. जी असेंब्ली दीनदुबळ्या श्रमिकांच्या दास्याची आणि शोषण करणाऱ्यांच्या गळाकापू शक्तीची

कडवट आठवण करून देते त्या संस्थेकडून भारतातील लाखो श्रमिक लोक कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करू शकत नाहीत, हा आमचा विश्वास तेथे गेल्यावर आणखीनच दृढ झाला.

ज्याला आम्ही रानटी आणि अमानुष समजतो असा तो कायदा देशाच्या प्रतिनिधींच्या माथी मारला गेला. कामगारांना अशा प्रकारे त्यांच्या प्राथमिक हक्कांपासून वंचित केले गेले आणि त्यांच्या आर्थिक मुक्तीचे एकमेव हत्यार त्यांच्या हातातून हिसकावून घेतले गेले. अंग मोडून मेहनत करणाऱ्या मूक श्रमिकांच्या परिस्थितीचा ज्याने आमच्याप्रमाणे विचार केला आहे असा कुणीही माणूस शांत चित्ताने हे सर्व पाहू शकेल असे वाटत नाही. शोषकांच्या बलिवेदीवर—आणि सरकार स्वत:च सर्वात मोठा शोषक आहे—मजुरांचे दररोज होणारे ते बकऱ्यांसारखे मूक बलिदान पाहून ज्याच्या ज्याच्या आतड्याला पीळ पडतो तो माणूस स्वत:च्या आत्म्याच्या चित्काराची उपेक्षा करू शकत नाही.

गव्हर्नर जनरलच्या कार्यकारिणी समितीचे माजी सदस्य स्वर्गीय एस.आर. दास यांनी आपल्या मुलाला लिहिलेल्या प्रसिद्धी पत्रात म्हटले होते की इंग्लंडची सुखनिद्रा भंग करण्यास बॉम्बचा उपयोग आवश्यक आहे. श्री. दास यांचे हेच शब्द प्रमाण मानून आम्ही संसद भवनात बॉम्ब फेकले. कामगारांच्या वतीने बिलाचा निषेध व्यक्त करण्यासाठी आम्ही ते कृत्य केले. आपल्या जीवघेण्या यातना व्यक्त करण्यासाठी त्या निराधार मजुरांकडे दुसरे कोणतेही साधनच नव्हते. आमचा एकमेव उद्देश होता: 'बहिऱ्यांना ऐकवणे' आणि संधी मिळालीच तर या पीडित जनतेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला वेळ आहे तोवर इशारा देणे. हे आमचे एकमेव उद्दिष्ट होते.

अथांग प्रशांत सागररूपी भारतीय मानवतेची ही वरवर दिसणारी शांतता म्हणजे कोणत्याही क्षणी उद्भवणाऱ्या एका भीषण तुफानाचे चिन्ह आहे. आम्ही तर फक्त येणाऱ्या भीषण संकटाची पर्वा न करता बेफाम वेगाने पुढे धावणाऱ्या लोकांसाठी (इंग्रजांसाठी) धोक्याची घंटा वाजवली आहे. 'आदर्श अहिंसे' चे युग आता संपले आहे आणि आज उदयाला येणाऱ्या नव्या पिढीला त्या 'आदर्श अहिंसे'च्या व्यर्थतेबद्दल कोणत्याही प्रकारचा संदेह उरलेला नाही, एवढेच फक्त आम्ही जनतेला सांगू इच्छितो.

मानवतेबद्दल आम्हाला हार्दिक सद्भावना आणि निस्सीम प्रेम वाटत असल्यामुळे निरर्थक रक्तपातापासून तिला वाचवण्यासाठीच, केवळ इशारा देण्याकरता आम्ही हा उपाय वापरला आणि नजिकच्या भविष्यातला तो रक्तपात आम्हालाच नव्हे तर लाखो लोकांना आधीपासूनच दिसतो आहे.

## आदर्श अहिंसा

वर आम्ही 'आदर्श अहिंसा' हा शब्दप्रयोग वापरला आहे. येथे त्याची व्याख्या करणेही आवश्यक आहे. आक्रमण करण्याच्या हेतूने जेव्हा बळाचा वापर केला जातो



त्याला हिंसा म्हणतात आणि नैतिक दृष्टिकोनातून त्याचे समर्थन करता येत नाही. परंतु जेव्हा एखाद्या उचित आदर्शासाठी त्याचा वापर केला जातो तेव्हा नैतिकदृष्ट्याही ते कृत्य उचित असते. कोणत्याही परिस्थितीत बलप्रयोग केला जाऊ नये हा विचार आदर्शवादी आणि अव्यवहारी आहे. गुरू गोविंद सिंग, शिवाजी, केमाल पाशा, रिजाखान, वॉशिंग्टन, गॅरीबाल्डी, लाफायेत आणि लेनिन यांच्या आदर्शांपासून स्फूर्ती घेऊन आणि त्यांच्या पाऊलखुणांवर पाऊल ठेवूनच भारतात उसळणारे हे नवे आंदोलन निर्माण होत आहे की ज्याची पूर्वसूचना आम्ही देत आहोत. भारतातील परकीय सरकार आणि आमचे राष्ट्रीय पुढारी दोघेही या आंदोलनाबाबत उदासीन आहेत आणि जाणूनबुजून त्याच्या हाकांना प्रतिसाद न देता आपले कान बंद ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही असा एक इशारा त्यांना देणे हे आम्ही आमचे कर्तव्य मानले.

## आमचे म्हणणे

आतापर्यंत आम्ही या घटनेमागील मूळ उद्देशावरच प्रकाश टाकला. आता आम्ही आमचे म्हणणे काय आहे हे स्पष्ट करू इच्छितो.

या घटनेमध्ये मामुली जखमा झालेल्या व्यक्तींबद्दल किंवा असेंब्लीमधील कुणाही दुसऱ्या व्यक्तीबद्दल आमच्या मनात थोडीही वैयक्तिक द्वेषभावना नव्हती हे सांगण्याची जरूर नाही. पण तरीही आम्ही पुन्हा एकदा स्पष्ट करतो की मानवजीवनाला आम्ही अत्यंत पवित्र मानतो आणि आम्ही दुसऱ्या कुणा व्यक्तीला इजा करण्याऐवजी मानवजातीची सेवा करता करता हसत हसत स्वत: प्राणार्पण करू. मनुष्यहत्या हेच ज्यांचे काम असते त्या साम्राज्यशाहीच्या भाडोत्री सैनिकांसारखे आम्ही नव्हेत. आम्ही मानवजीवनाची कदर करतो आणि त्याचे रक्षण करण्याचा सतत आटोकाट प्रयत्न करतो. असे असूनही आम्ही हे मान्य करतो की आम्ही जाणूनबजून असेंब्लीत बॉम्ब फेकले.

आमच्या या म्हणण्यावर घटनाच प्रकाश टाकत आहे आणि आमच्या कृत्याच्या परिणामांवरूनच आमचा इरादा काय होता हे ठरवले पाहिजे. केवळ तर्काने किंवा काल्पनिक गोष्टींवरून ते ठरवले जाऊ नये. सरकारी तज्ज्ञांच्या साक्षीविरुद्ध आम्ही हे सांगू इच्छितो की आम्ही असेंब्लीत फेकलेल्या बॉम्बमुळे फक्त एका रिकाम्या बाकड्याची मोडतोड झाली आणि सुमारे पाचसहा माणसांना थोडेसे खरचटले. सरकारी शास्त्रज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे बॉम्ब शक्तिमान होते आणि तरीही त्यांच्यामुळे अधिक नुकसान झाले नाही हा चमत्कारच म्हणावा लागेल. पण आमच्या मते शास्त्रशुद्ध पद्धतीने ते बॉम्ब तसेच बनवले गेलेले होते. पहिली गोष्ट म्हणजे बाके आणि डेस्क्स यांच्यामधील रिकाम्या जागेत दोन्ही बॉम्ब पडले. दुसरी गोष्ट म्हणजे त्या जागेपासून दोन फुटांच्या अंतरावर बसलेल्या लोकांना—ज्यांच्यात श्री. पी. आर. राव, श्री. शंकर राव आणि सर जॉर्ज शूस्टर यांची नावे उल्लेखनीय आहेत—कोणतीही इजा झाली नाही किंवा अगदीच नाममात्र इजा झाली. सरकारी तज्ज्ञांच्या

म्हणण्याप्रमाणे अधिक शक्तिमान असे पोटॅशियम क्लोरेट आणि पिक्रिक ॲसिड त्या बॉम्बमध्ये असते तर त्याने लाकडी कठडा तोडून काही फर्लांगावर उभ्या असणाऱ्या लोकांपर्यंत सर्वांना उडवले असते आणि जर त्याहूनही शक्तिशाली स्फोटक पदार्थ त्या बॉम्बमध्ये भरला असता तर असेंब्लीतील बहुतेक सभासदांना त्या बॉम्बने निश्चितच उडवले असते. एवढेच नाही, आमची इच्छा असती तर आम्ही ते बॉम्ब सरकारी कक्षात फेकू शकलो असतो कारण ती गॅलरी खास व्यक्तींनी अगदी खच्चून भरलेली असते. किंवा आम्ही सर जॉन सायमनलाच आमचे लक्ष्य बनवले असते. कारण त्याच्या दुर्दैवी कमिशनमुळे विचार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात त्याच्याविषयी तीव्र तिरस्कार निर्माण झालेला होता आणि त्यावेळी तो असेंब्लीच्या अध्यक्षीय कक्षामध्ये बसलेलाही होता. परंतु आमचा असला कोणताही हेतू नव्हता आणि ज्या कामासाठी ते बॉम्ब तयार केले गेले होते नेमके तेवढेच काम त्या बॉम्बने केले. तो नेमक्या ठरवलेल्या ठिकाणी म्हणजेच रिकाम्या असलेल्या जागीच पडला, या पलीकडे त्याने दुसरे काही वाईट केले नाही!

## एक ऐतिहासिक धडा

यानंतर आमच्या कृत्याबद्दल शिक्षा भोगण्यासाठी आम्ही जाणूनबुजून स्वत:ला पोलीसांच्या स्वाधीन केले. साम्राज्यवादी शोषकांना आम्ही हे सांगू इच्छितो की मूठभर लोकांना मारून कोणतेही उदात्त ध्येय गाडून टाकता येत नाही किंवा दोन य:कश्चित व्यक्तींना तुडवून टाकून राष्ट्र दडपून ठेवता येत नाही. फ्रान्समधील क्रांतिकारक चळवळ दडपण्यासाठी परिचयपत्र वा परिचयचिन्ह (आयडेंटिटी कार्ड) पद्धत अथवा बॅसिलचा भयानक दगडी तुरुंग असमर्थ ठरले. रशियन क्रांतीची आग फाशीचे तख्त आणि सैबेरियातील हद्दपारी यामुळे विझली नाही. या इतिहासाच्या अनुभवावर लक्ष वेधण्याची आमची इच्छा होती. मग वटहुकूम आणि सुरक्षा कायदे भारतीय स्वातंत्र्याची ज्योत विझवू शकतील काय? गुप्त कटांचा तपास लावून किंवा कपोलकल्पित कट–कारस्थानांचा आधार घेऊन नौजवानांना शिक्षा ठोठावून, किंवा एका महान ध्येयाच्या स्वप्नाने प्रेरित झालेल्या नवयुवकांना तुरुंगात डांबून क्रांतीचे अभियान थोपवता येईल काय? होय, जर त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाणार नसेल तर वेळेवर दिलेल्या सार्वत्रिक इशाऱ्याने लोकांचे प्राण वाचवणे शक्य आहे आणि निरर्थक हालअपेष्टांपासून त्याचे रक्षण करणे शक्य आहे. अशी पूर्वसूचना देण्याच्या कामाचा हा भार उचलून आम्ही आमचे कर्तव्य पूर्ण केले आहे.

## क्रांती म्हणजे काय ?

'तुमच्या मते क्रांतीचा अर्थ काय?' असा प्रश्न भगतसिंगाला खालच्या कोर्टात विचारला गेला होता. त्या प्रश्नाचे उत्तर देताना त्याने सांगितले होते की **क्रांतीसाठी रक्तरंजित युद्ध अनिवार्य नाही, तसेच यामध्ये व्यक्तिगत प्रतिहिंसेला कसलेही स्थान**



**नसते. क्रांती म्हणजे केवळ बॉम्ब व पिस्तुले यांचा पंथ नव्हे. आमच्या मते क्रांती म्हणजे अन्यायावर आधारलेल्या प्रचलित समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन.**

समाजाचे प्रमुख अंग असूनही आज कामगारांना त्यांच्या प्राथमिक हक्कापासून वंचित ठेवले जाते आणि शोषण करणारे भांडवलदार त्यांच्या निढळाच्या कमाईतून निर्माण होणारी सर्व संपत्ती हडपून टाकतात. दुसऱ्यांचे अन्नदाते असणारे शेतकरी आज सहकुटुंब एकेका दाण्यासाठी गरजवंत बनले आहेत. जगभरच्या बाजारपेठांसाठी कपडे उपलब्ध करून विणकरांना आपले व पोराबाळांचे शरीर झाकण्याइतके देखील कापड मिळत नाही. सुंदर महाल निर्माण करणारे गवंडी, लोहार, सुतार स्वत: मात्र घाणेरड्या झोपड्यात राहून आपली जीवनलीला समाप्त करतात. या विपरित समाजातील शोषक भांडवलदार छोट्यामोठ्या कारणांसाठी लाखो लोकांचे नशीब उलटेपालटे करू शकतात.

ही भयानक विषमता आणि जबरदस्तीने लादला गेलेला भेदभाव जगाला एका महाभयंकर प्रलयाकडे खेचून नेत आहे. ही स्थिती अधिक काळ टिकून रहाणे शक्य नाही. हे स्पष्ट आहे की धनिक समाज एका भयंकर ज्वालामुखीच्या तोंडावर बसून रंगेल चैनबाजी करत आहे आणि या शोषकांची निष्पाप मुले आणि कोट्यवधी शोषित जनता एका भयानक दरीच्या काठावरून चालत आहे.

## आमूलाग्र परिवर्तनाची आवश्यकता

संस्कृतीचा हा प्रासाद वेळीच सावरला गेला नाही तर लवकरच चक्काचूर होऊन तो जमीनदोस्त होईल. एका आमूलाग्र परिवर्तनाची गरज आहे आणि ज्यांना ही गोष्ट उमजली आहे त्यांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी साम्यवादी सिध्दांतावर आधारित समाजाची पुनर्निर्मिती केली पाहिजे. जोपर्यंत हे केले जात नाही आणि माणसाचे माणसांकडून होणारे शोषण किंवा ज्याला आपण साम्राज्यशाही म्हणतो ते एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्राकडून होणारे शोषण नष्ट केले जात नाही तोपर्यंत मानवतेची यातनातून सुटका होणार नाही; आणि तोपर्यंत युद्ध थांबवून विश्वशांतीचे युग निर्माण करण्याच्या सर्व गोष्टी म्हणजे निव्वळ ढोंग असण्याखेरीज दुसरे काही नाही. क्रांतीचा आम्हाला अभिप्रेत असणारा अंतिम अर्थ असा आहे की जी वरील प्रकारच्या सर्व संकटापासून मुक्त असलेली आणि जिच्यात सर्वहारा वर्गाची अधिसत्ता सर्वमान्य असेल अशी एक समाजव्यवस्था स्थापन करणे. याच्या परिणामी निर्माण होणारा विश्वसंघच पीडित मानवतेला भांडवलशाहीच्या जोखडातून मुक्त करण्यास आणि साम्राज्यवादी युद्धाच्या विनाशातून सोडवण्यास समर्थ होऊ शकेल.

## समयोचित इशारा

हे आमचे ध्येय आहे, आदर्श आहे आणि या ध्येयापासून प्रेरणा घेऊन आम्ही कळकळीचा आणि जोरदार इशारा दिला आहे. पण जर आमच्या या इशाऱ्याकडे लक्ष दिले गेले नाही आणि सध्याच्या शासनसंस्थेने उठणाऱ्या जनशक्तीच्या वाटेत

अडथळे आणण्याचे काम बंद केले नाही, तर मात्र क्रांतीच्या ह्या ध्येयाच्या पूर्तीसाठी एक भयंकर युद्ध पेटणे अनिवार्य आहे. सर्व बंधनांना व अडथळ्यांना तुडवून पुढे जाणाऱ्या त्या युद्धाच्या शेवटी, सर्वहारा वर्गाच्या सर्वाधिकारशाहीची स्थापना होईल. ही सर्वाधिकारशाहीच क्रांतीच्या ध्येयाची पूर्ती करण्याचा मार्ग प्रशस्त बनवेल. क्रांती हा मानवजातीचा जन्मजात अधिकार आहे की जो हिरावून घेतला जाऊ शकत नाही. स्वातंत्र्य हा प्रत्येक माणसाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. खरे पाहता श्रमिकवर्गच समाजाचे पोषण करतो. जनतेच्या सर्वंकष सत्तेची स्थापना हे श्रमिकवर्गाचे अंतिम उद्दिष्ट आहे. या ध्येयासाठी आणि या विश्वासासाठी आम्हाला जी काही शिक्षा होईल तिचे आम्ही सहर्ष स्वागत करू. क्रांतीच्या या पूजावेदीवर आम्ही आमचे यौवन नैवेद्य म्हणून आणले आहे, कारण या महान ध्येयांसाठी मोठ्यात मोठा त्यागसुद्धा कमीच आहे. आम्ही संतुष्ट आहोत आणि क्रांतीच्या आगमनाची उत्सुकतेने प्रतीक्षा करत आहोत.

इन्किलाब झिंदाबाद!

*('मागोवा' प्रकाशित 'आम्ही कशासाठी लढत आहोत' मधून पुनर्मुद्रित.)*

***

***"जगाच्या इतिहासाची पानं उघडून पहा. युवकांच्या रक्ताने लिहिलेले अमर संदेश आढळतील! जगातल्या सगळ्या क्रांत्यांची, स्वातंत्र्य युध्दांची वर्णने पहा, त्यात केवळ ते युवकच भेटतील, ज्यांना बुध्दिवंतांनी माथेफिरू, वाट चुकलेले म्हणून हिणवले आहे. पण जे सुरक्षित किल्ल्यात बसले आहेत त्यांना काय कळणार किल्ल्याच्या खंदकावर स्वत:च्या शरीराचे पूल तयार करणारे जपानी युवक कोणत्या पोलादापासून बनले होते?"***

***– भगतसिंग***



# अखेरचा संदेश

*(आपल्या पक्षाच्या कार्यक्रमाविषयी भगतसिंगने येथे मांडणी केलेली आहे. भगतसिंगला फाशी झाल्यानंतर, ३ ऑक्टोबर १९३१ रोजी कलकत्त्यामध्ये अटक केलेल्या श्रीमती विमला प्रतिभादेवी यांच्या घराच्या झडतीत हे कागद सरकारला सापडले. त्यातला गांधीविरोधी भाग सरकारने प्रसिद्ध केला, पण बाकीचा सर्व दडपून ठेवला. भगतसिंगचे एक सहकारी श्री. शिव वर्मा यांच्याकडून या लेखाची इंग्रजी प्रत आम्हाला उपलब्ध झाली. भगतसिंग अगोदरपासूनच म्हणजे १९२७-२८ पासून समाजवादी विचारांकडे वळत होता; अखेरच्या दिवसांत त्याच्या विचारांमध्ये या दिशेने किती स्पष्टता व पक्केपणा आलेला होता याचे दर्शन या आवाहनावरून आपल्याला होते.)*

प्रिय साथींनो,

आपली चळवळ सध्या एका अत्यंत महत्त्वाच्या अवस्थेतून जात आहे. एका वर्षाच्या जोरदार लढ्यानंतर आता गोलमेज परिषदेने घटनात्मक सुधारणांविषयी काही ठराव मांडले आहेत आणि काँग्रेसच्या नेत्यांना त्याबद्दल (मते मांडण्यासाठी) आमंत्रित करण्यात आले आहे. या परिस्थितीत काँग्रेसच्या नेत्यांना त्यांचे आंदोलन मागे घेणे योग्य वाटत आहे. ते आंदोलन मागे घेतात की नाही याला आपल्या दृष्टीने फारसे महत्त्व नाही. सध्याचे आंदोलन कोणत्या ना कोणत्या प्रकारची तडजोड होऊन बंद होणे अटळ आहे. ही तडजोड आज ना उद्या होणारच आहे आणि आपण साधारणपणे विचार करतो त्याप्रमाणे तडजोड ही काही नेहमीच अपमानास्पद व निषेधार्ह गोष्ट नसते. जुलमी सत्ताधीशांविरुद्ध उभ्या राहणाऱ्या कोणत्याही राष्ट्राला सुरुवातीला अपयश येणारच आणि संघर्षाच्या मधल्या काळात तडजोडी करून काही आंशिक सुधारणा पदरात पाडून घेणे हे करावेच लागते आणि नंतर राष्ट्राच्या सर्व शक्तीची सर्व साधने पूर्णपणे संघटित झाल्यावरच, संघर्षाच्या फक्त शेवटच्या टप्प्यावरच, शेवटचा आघात करून सत्ताधाऱ्यांचे सरकार उखडून टाकणे शक्य होते. पण त्याहीवेळी अपयशी ठरून कोणत्यातरी प्रकारे तडजोड करणे कधीकधी अटळ होते. रशियाच्या उदाहरणावरून हे सर्वात चांगल्या पद्धतीने समजून घेता येते.

१९०५ साली रशियात एका क्रांतिकारक आंदोलनाला तोंड फुटले. परदेशात आश्रयाला गेलेला लेनिन रशियात परत आला होता. तो या लढ्याचे नेतृत्व करत होता. लोक त्याला सांगायला आले की एक डझन जमीनदारांना ठार करून त्यांचे महाल जाळण्यात आले आहेत. लेनिनने त्यांना सांगितले परत जा आणि बाराशे जमीनदारांना ठार करा आणि त्यांचे महाल जाळून टाका ! त्याच्या मते जरी क्रांती अपयशी झाली तरी यामुळे बरेच साध्य झाले असते. नंतर ड्यूमाची सुरुवात झाली. (ड्यूमा हे त्यावेळी झारने स्थापन केलेले संसदगृह-अनुवादक.) त्याच लेनिनने

ड्यूमामध्ये भाग घ्यायला पाहिजे असे प्रतिपादन केले. हे १९०७ मध्ये त्याने सांगितले. १९०६ मध्ये पहिल्या ड्यूमामध्ये भाग घेण्यास लेनिनचा विरोध होता व त्यावर बहिष्कार टाकावा असे त्याचे मत होते. खरे तर ह्या पहिल्या ड्यूमाने दुसऱ्या (१९०७ मधल्या) ड्यूमापेक्षाही जास्त प्रमाणात काम करायला मोकळीक दिली होती; दुसऱ्या ड्यूमाचे बरेचसे हक्क काढून घेण्यात आलेले होते. १९०७ च्या बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे हे घडले. प्रतिक्रांतिकारक शक्ती वरचढ बनत होत्या व ड्यूमाच्या व्यासपीठाचा समाजवादी कल्पनांवर चर्चा घडवून आणण्याचे व्यासपीठ म्हणून उपयोग करण्याची लेनिनला गरज वाटत होती.

पुन्हा १९१७ च्या क्रांतीनंतर बोल्शेविकांना ब्रेस्ट–लिटोव्हस्क् तहावर सह्या करणे भाग पडले–लेनिन वगळता सर्वांचा याला विरोध होता. पण लेनिन म्हणाला, शांतता, शांतता आणि पुन्हा शांतता! कितीही किंमत देऊन शांतता! जर्मन लष्करशहांना रशियाचे अनेक प्रांत तोडून द्यावे लागले तरीही! जेव्हा हा तह केल्याबद्दल काही बोल्शेविक विरोधी लोकांनी लेनिनचा निषेध केला तेव्हा त्याने खुलेपणाने जाहीर केले की जर्मन चढाईचा मुकाबला करणे बोल्शेविकांना शक्य नव्हते आणि बोल्शेविक सरकार पूर्णपणे नष्ट होण्यापेक्षा असा तह करणे जास्त चांगले असे त्यांनी ठरवले.

मला मुद्दा हा मांडायचा आहे की, तडजोड हे सुद्धा एक आवश्यक शस्त्र आहे व लढ्याच्या विकासात अनेकदा ते वापरावे लागते. पण जी गोष्ट आपण सतत स्वत:समोर ठेवली पाहिजे ती म्हणजे आंदोलनाचे ध्येय. आपण कोणते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लढत आहोत याविषयी स्पष्ट कल्पना आपल्यासमोर ठेवली पाहिजे. आपल्या चळवळीचे यशापयश जोखणे व पुढचे कार्यक्रम सहजतेने ठरवणे याकरता याची मदत होते. टिळकांचे ध्येय काय होते हे बाजूला ठेवा; पण त्यांचे धोरण, त्यांची व्यूहरचना उत्कृष्ट होती. तुमच्या शत्रूकडून सोळा आणे मिळवण्यासाठी तुम्ही झगडता आहात, पण तुम्हाला फक्त एकच आणा मिळतो आहे–तो खिशात घाला आणि उरलेल्यासाठी लढा. नेमस्तांच्या बाबतीत त्यांचे उद्दिष्ट काय होते हे नीट बघा. ते एक आणा मिळवण्यासाठीच सुरूवात करतात आणि त्यांना तोही मिळत नाही– क्रांतिकारकांनी हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे की त्यांचा झगडा संपूर्ण क्रांतीसाठी आहे. सत्ता पूर्णपणे त्यांच्या हातात आली पाहिजे. या दृष्टीने तडजोडीचे भय असते ते तडजोडीनंतर, स्थितीवादी शक्ती क्रांतिकारक शक्तींना विस्कटून टाकण्याचा प्रयत्न करतात म्हणून. पण कसलेले व धैर्यशील क्रांतिकारक नेते अशा धोक्यापासून चळवळीला वाचवू शकतात. अशा प्रसंगामध्ये आपण अतिशय काळजीपूर्वक वागले पाहिजे व खरे प्रश्न काय आहेत, चळवळीचे ध्येय काय आहे, याबाबत गोंधळ उडू देता कामा नये. ब्रिटिश कामगार नेत्यांनी (लेबर लीडर्स) खऱ्या संघर्षाचा विश्वासघात केलेला आहे व आज ते केवळ ढोंगी साम्राज्यवादी उरले आहेत. माझ्या मते आपल्या दृष्टीने कडवे 'जैसे थे' वादी, या सफाईदार साम्राज्यवादी लेबर



लीडर्सपेक्षा जास्त चांगले. चळवळीची धोरणे व डावपेच याबद्दल प्रत्येकाने लेनिनचे जीवनकार्य अभ्यासले पाहिजे. तडजोडीविषयीची त्यांची निश्चित मते त्यांच्या लेफ्ट विंग कम्युनिझम' या पुस्तकामध्ये सापडतील.

मी वर असे म्हटले आहे की सध्याचे आंदोलन, म्हणजे सध्याचा लढा हा एकतर कुठल्यातरी तडजोडीने संपेल नाहीतर पूर्णपणे पराभूत होईल.

मी हे म्हणण्याचे कारण माझ्या मते या वेळी खऱ्या क्रांतिकारक शक्ती लढाईच्या मैदानात उतरलेल्या नाहीत. हा लढा मध्यमवर्गीय दुकानदार व काही थोडे भांडवलदार यांच्यावर आधारलेला आहे. हे दोघेजण आणि विशेषत: यातली दुसऱ्या प्रकारची मंडळी कधीही कोणत्याही लढ्यामध्ये स्वत:ची मालमत्ता वा संपत्ती धोक्यात घालायला धजणार नाहीत. खऱ्या क्रांतिकारक सैन्याच्या तुकड्या खेड्यापाड्यांमध्ये व कारखान्यांमध्ये आहेत, शेतकरी व कामगार आहेत. पण या शक्तींना हाताळणे आपल्या भांडवली नेत्यांना नको आहे. तसे धाडस त्यांना होणेच शक्य नाही. हा निद्रिस्त सिंह एकदा झोपेतून जागा झाला तर त्याला आवरणे शक्य होणार नाही. आपल्या नेत्यांना जे साधायचे आहे ते साध्य झाल्यानंतरसुद्धा तो थांबणार नाही. १९२० मध्ये अहमदाबादच्या कामगारांचा पहिला अनुभव घेतल्यानंतर महात्मा गांधीनी म्हटले, "कामगारांना आपण हात लावणे टाळायला हवे. कारखान्यातल्या कामगारवर्गाचा राजकीय वापर करणे धोकादायक आहे" (द टाइम्स, मे १९२९). त्या वेळेनंतर कामगारांकडे वळण्याचे धाडस या नेत्यांना कधीही झाले नाही. मग उरतो शेतकरी. जेव्हा महाकाय शेतकरी वर्ग केवळ एका परक्या राष्ट्राच्या सत्तेचेच नव्हे तर जमीनदार वर्गाचेही जोखड उलथून फेकून द्यायला निघालेला पाहिला तेव्हा या नेत्यांना जी धडकी भरली तिचे स्पष्ट प्रतिबिंब १९२२ च्या बार्डोली ठरावामध्ये पहायला मिळते.

ह्याच ठिकाणी आपले नेते शेतकऱ्यांपुढे झुकण्यापेक्षा ब्रिटिशांपुढे शरण जाणे जास्त पसंत करतात. पं. जवाहरलाल वगळा. दुसऱ्या कुठल्या एकातरी नेत्याचे तुम्ही नाव घेऊ शकता का की ज्याने शेतकरी व कामगारांना संघटित करण्यासाठी काही प्रयत्न केले आहेत? नाही, हा धोका ते पत्करणार नाहीत. येथे ते कमी पडतात. त्यांना संपूर्ण क्रांती नको आहे असे मी म्हणतो ते यामुळेच. आर्थिक व प्रशासकीय दडपणांच्या द्वारा काही सुधारणा, भारतीय भांडवलदारांना काही सवलती पदरात पाडून घेता येतील अशी त्यांना आशा आहे. म्हणूनच मी म्हणतो की हे आंदोलन मरून जाणे अटळ आहे. ते एखादी तडजोड करून मग मरेल किंवा त्याशिवायच संपून जाईल. 'इन्किलाब झिंदाबाद' ची घोषणा मन:पूर्वक व प्रामाणिकपणे करणारे तरुण कार्यकर्ते आज स्वत:च्या खांद्यावर लढा घेऊन पुढे नेण्याइतके सुसंघटित नाहीत व त्यांची शक्ती कमी आहे. वस्तुस्थिती अशी आहे की आपले मोठमोठे नेते सुद्धा स्वत:च्या खांद्यावर काही जबाबदारी घेण्याचे धाडस दाखवायला तयार नाहीत. कदाचित फक्त पं. मोतीलाल नेहरू याला अपवाद म्हणता येतील. यामुळेच ते सारखे

गांधीजींसमोर विनाशर्त शरणागती पत्करत आहेत. मतभेद असूनदेखील गांधीजींना विरोध करण्याचे धैर्य ते कधीच दाखवत नाहीत आणि ठराव पास होतात ते महात्माजींच्या साठीच.

या परिस्थितीत, क्रांतीशी गंभीरपणे निष्ठा बाळगणाऱ्या तळमळीच्या तरुण कार्यकर्त्यांना मला इशारा द्यावासा वाटतो की खडतर काळ पुढे आहे. आपण गोंधळून जाणार नाही व निराश होणार नाही, ही काळजी त्यांनी घेतली पाहिजे. महात्मा गांधींच्या दोन आंदोलनांच्या आपण घेतलेल्या अनुभवानंतर आज आपण आपली सध्याची परिस्थिती व पुढचा कार्यक्रम यांच्याविषयी स्पष्ट मांडणी करून घेऊ शकतो.

आता मला अगदी सोप्या प्रकारे याविषयी मांडणी करण्याची परवानगी द्या. तुम्ही नारा देता, 'इन्किलाब झिंदाबाद'. मी असे गृहित धरतो की खरोखरच तुम्हाला गंभीरपणे क्रांती हवी आहे. असेंब्ली बॉम्ब केसमध्ये दिलेल्या जबानीमध्ये क्रांती म्हणजे काय याची व्याख्या आम्ही केली होती. ती अशी होती: क्रांती म्हणजे सध्या अस्तित्वात असणारी समाजव्यवस्था संपूर्णपणे उलथवून टाकून तिच्या जागी समाजवादी व्यवस्था प्रस्थापित करणे. ह्या ध्येयाच्या पूर्तीसाठी आपले ताबडतोबीचे उद्दिष्ट आहे सत्ता हस्तगत करणे. वस्तुस्थिती अशी आहे की राज्यसंस्था, शासकीय यंत्रणा हे एक सत्ताधारी वर्गाच्या हातातले स्वत:चे हितसंबंध राखण्यासाठी व जोपासण्यासाठी वापरायचे हत्यार आहे. आम्हाला ते हिसकावून घेऊन आमच्या ध्येयपूर्तीसाठी हाताळायचे आहे, वापरायचे आहे आणि आमचे ध्येय आहे एका नव्या पायावर, मार्क्सवादाच्या पायावर समाजाची पुनर्रचना. हे साध्य करण्याकरता आपण शासन यंत्रणा हातात घेण्यासाठी लढत आहोत. यामध्ये आपण सातत्याने जनसमुदायाचे शिक्षण केले पाहिजे व आपल्या सामाजिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमासाठी पोषक वातावरण तयार केले पाहिजे आणि आंदोलनामध्येच आपण त्यांना सर्वांत चांगल्या प्रकारे शिकवू शकतो व प्रशिक्षण देऊ शकतो.

ह्या गोष्टी स्पष्टपणे समोर ठेवून म्हणजेच आपले ताबडतोबीचे व अंतिम उद्दिष्ट स्पष्ट करून घेतल्यानंतर, आपण आता सध्याच्या परिस्थितीची तपासणी करू शकतो. कोणत्याही परिस्थितीचे विश्लेषण करताना आपण नेहमी अत्यंत परखड व अगदी वास्तवनिष्ठ राहिले पाहिजे.

हिंदुस्थानच्या सरकारात भारतीय जनतेला सहभाग व जबाबदारीचे स्थान मिळाले पाहिजे यासाठी जोरदार आवाज उठवला गेल्यानंतर मिंटो–मोर्ले सुधारणा देण्यात आल्या व त्यांच्यामध्येही केवळ सल्लामसलतीचा हक्क असणारे व्हाईसरॉय कौन्सिल मान्य करण्यात आले. महायुद्धामध्ये भारतीयांच्या मदतीची फार गरज होती तेव्हा स्वयंशासनाबद्दल आश्वासने दिली गेली व सध्या अस्तित्वात असलेल्या सुधारणा अंमलात आणल्या गेल्या. त्यांच्यानुसार असेंब्लीला कायदे करण्याची



मर्यादित सत्ता प्रदान केली गेली. पण शेवटी असेंब्लीच्या निर्णयाला संमती देणे व्हाइसरॉयच्या मर्जीवरच अवलंबून आहे. आता तिसरा टप्पा सुरू होत आहे.

आता पुन्हा सुधारणांविषयी चर्चा चालू आहे व नवे कायदे करायचे घाटत आहे. तरुणांनी याबद्दल काय भूमिका घ्यायला हवी? हा प्रश्न आहे. येऊ घातलेल्या सुधारणांबद्दल काँग्रेसचे नेते कोणते मानदंड लावून मत बनवणार आहेत मला ठाऊक नाही. पण आम्ही क्रांतिकारकांनी याबाबत खालील निकष लावले पाहिजेत.

- किती प्रमाणात भारतीयांच्या हातात जबाबदारी सोपविण्यात येणार आहे.
- नव्या शासकीय संस्थांचे स्वरूप काय असणार आहे व जनसमुदायांना सहभागी होण्याचे अधिकार किती प्रमाणात असणार आहेत.
- भविष्यातील संभाव्यता व खबरदारीचे उपाय.

या निकषाबाबत थोडे अधिक स्पष्टीकरण करावे लागेल. पहिली गोष्ट कारभारी मंडळावर (एक्झिक्यूटिव्हवर) आपल्या प्रतिनिधींना किती नियंत्रण करायला मिळणार आहे यावरून आपण आपल्या जनतेला किती प्रमाणात जबाबदारीची भूमिका देण्यात आली आहे हे सहज ठरवू शकतो. आतापर्यंत कधीही कारभारी मंडळ हे विधिमंडळाला जबाबदार नव्हते आणि व्हाइसरॉयला अंतिम नकाराधिकार (व्हेटो) होता; त्यामुळे निवडून आलेल्या असेंब्लीच्या सदस्यांच्या सगळ्या धडपडीला काहीच अर्थ नव्हता. हा विशेष अधिकार सारखा सारखा वापरायचा आणि राष्ट्रीय प्रतिनिधींनी गंभीरतापूर्वक घेतलेले निर्णय बेशरमपणे पायदळी तुडवायचे हीच नीती व्हाईसरॉयने अवलंबली होती (स्वराज्य पक्षाला याबद्दल धन्यवाद द्यायला हवेत); हे सगळे आपल्याला चांगले ठाऊक असल्याने त्याची आणखी चर्चा करायची गरज नाही.

म्हणून पहिली गोष्ट आपण कारभारी मंडळाची रचना कशी केली जाणार आहे हे बघितले पाहिजे. एखाद्या लोकांच्या विधिमंडळाकरवी (पॉप्युलर असेंब्ली) ते निवडून दिले जाणार आहे, का हे पूर्वीप्रमाणेच वरून लादण्यात येणार आहे? आणि ते विधिमंडळाला जबाबदार राहणार आहे का पूर्वीप्रमाणेच विधिमंडळाला पूर्णतया धाब्यावर बसवणार आहे?

वरील दुसऱ्या मुद्याबाबत मत ठरवताना आपण मतदानाच्या हक्काची व्याप्ती बघून ठरवायला हवे. गाठीशी मालमत्ता असणाऱ्या व्यक्तीलाच मतदानाचा हक्क मिळेल हा नियम निखालसपणे रद्द केला पाहिजे. प्रत्येक प्रौढ स्त्री–पुरुषाला मत देण्याचा हक्क असला पाहिजे. पण आपण केवळ हे बघू शकतो की मतदानाच्या हक्काची व्याप्ती काय ठेवली जाणार आहे.

(शासनसंस्थेच्या) स्वरूपाबद्दल बोलायचे तर आज आपल्या इथे दोन गृहे आहेत. बऱ्याचजणांचे मत असे आहे की वरिष्ठ सभागृह असणे ही केवळ एक भांडवली अंधश्रद्धा किंवा झालर आहे. माझ्या मते एकच गृह असणारे शासनाचे स्वरूप हे सर्वात चांगले ठरेल.

प्रांतीय स्वायत्ततेचाही उल्लेख येथे करायला पाहिजे. पण मी जे काय ऐकले आहे त्यावरून मी एवढेच म्हणू शकतो की वरून लादलेला, प्रांतांच्या विधिमंडळांच्या वर असणारा व विशेष अधिकार असलेला गव्हर्नर म्हणजे जुलमी सत्ताधीशापेक्षा वेगळा काही असू शकणार नाही. याला प्रांतांच्या स्वायत्ततेऐवजी प्रांतांवरची हुकूमशाही म्हणणेच जास्त योग्य ठरेल. शासनसंस्थेचे लोकशाहीकरण करण्याचा हा फारच चमत्कारिक प्रकार आहे.

तिसरा मुद्दा अगदी स्पष्ट आहे. ब्रिटिशांची पोतडी संपेपर्यंत दर दहा वर्षांनी सुधारणांचा एक हप्ता देण्याचे मॉंटेग्यूचे आश्वासन रद्द करून घेण्याचे प्रयत्न गेल्या दोन वर्षांमध्ये ब्रिटिश राजकारणी मंडळींनी चालवले आहेत.

भविष्याबद्दल त्यांनी काय ठरवले आहे हे आपण पाहू शकतो.

सध्याच्या परिस्थितीची चर्चा केल्यानंतर आपण कृतीची दिशा कोणती घ्यायची व आपला पुढचा कार्यक्रम काय असावा याची आता चर्चा करू.

अगोदरच मी म्हटल्याप्रमाणे कोणत्याही क्रांतिकारक पक्षाला निश्चित असा कार्यक्रम असणे अत्यंत आवश्यक असते. कारण क्रांती म्हणजेच कृती करणे, हे तुम्ही जाणले पाहिजे. क्रांती म्हणजे संघटित व पद्धतशीर कार्याद्वारा जाणीवपूर्वक घडवून आणलेला बदल. तो एखाद्या अचानक, असंघटित व उत्स्फूर्तपणे घडणाऱ्या बदलाच्या वा उलथापालथीच्या अगदी विरुद्ध स्वरूपाचा असतो आणि कार्यक्रम निश्चित करण्यासाठी अभ्यास करणे आवश्यक असते.

- अंतिम ध्येय
- जेथून आपण सुरुवात करायची आहे ती पूर्वस्थिती; म्हणजेच आज अस्तित्वात असणारी परिस्थिती
- कृतीची दिशा, म्हणजेच कार्याची साधने आणि पद्धती

या तीन घटकांची स्पष्ट कल्पना असल्याशिवाय कार्यक्रमाविषयी काही बोलणेही शक्य नाही.

सध्याच्या परिस्थितीची चर्चा आपण काही प्रमाणात केली आहे. अंतिम ध्येयाची सुद्धा थोडीशी ओळख करून घेतली आहे. आपल्याला समाजवादी क्रांती घडवावयाची आहे आणि तिची अत्यावश्यक पहिली पायरी आहे राजकीय क्रांती. आम्हाला हे हवे आहे. राजकीय क्रांतीचा अर्थ हा नव्हे की राज्यसंस्था (किंवा ढोबळमानाने बोलायचे तर सत्ता) केवळ ब्रिटिशांच्या हातातून भारतीयांच्या हातात घेणे, तर ती अशा भारतीयांच्या हाती येणे की ज्यांना आपले अंतिम ध्येय मान्य आहे. आणखी स्पष्ट बोलायचे तर क्रांती म्हणजे जनसमुदायांच्या पाठिंब्याद्वारा क्रांतिकारक पक्षाच्या हातात सत्ता येणे. त्यानंतर पुढचे काम म्हणजे संपूर्ण समाजाची समाजवादी पायावर पुनर्रचना करण्याचे कार्य संघटित करणे. क्रांतीचा हा अर्थ तुम्हाला अभिप्रेत नसेल तर माफ करा. 'इन्किलाब झिंदाबाद' असे ओरडणे थांबवा. निदान आम्हाला तरी क्रांती हा शब्द इतका पवित्र वाटतो की त्याचा थिल्लर गैरवापर



होता कामा नये. तुम्ही जर असे म्हणाल की तुम्हाला राष्ट्रीय क्रांती हवी आहे आणि तुमच्या लढ्याचे उद्दिष्ट भारतीय प्रजासत्ताकाची स्थापना हे आहे तर मी तुम्हाला विचारतो की ही तुमची क्रांती घडवण्यासाठी तुम्ही कोणत्या शक्तीवर विसंबायचे ठरवले आहे? राष्ट्रीय असो वा समाजवादी असो, कोणतीही क्रांती करू शकणाऱ्या एकमेव शक्ती शेतकरी, कामगार याच आहेत. कॉंग्रेसच्या नेत्यांकडे या शक्तींना संघटित करण्याइतके धैर्य नाही. ह्या चळवळीत तुम्ही हे पाहिले आहे. या शक्तींविना आपण हतबल ठरू ही गोष्ट इतर कोणाहीपेक्षा त्यांना जास्त चांगली ठाऊक आहे. जेव्हा त्यांनी पूर्ण स्वराज्याचा ठराव संमत केला—आणि पूर्ण स्वराज्याचा अर्थ खरोखरीच क्रांती असा होतो—तेव्हा वस्तुत: त्यांच्या मनात ते नव्हते. तरुणांच्या दबावामुळे त्यांना तसे करणे भाग पडले आणि मग एक धमकी म्हणून या घोषणांचा वापर करून, ब्रिटिशांकडून त्यांना अत्यंत प्रिय असलेली एक गोष्ट मिळवायची होती—वसाहतीचे स्वराज्य (डोमिनियन स्टेटस). कॉंग्रेसच्या गेल्या तीन अधिवेशनांमधील ठराव अभ्यासून तुम्ही याबाबत सहज मत ठरवू शकता. कलकत्याला त्यांनी एका वर्षात डोमिनियन स्टेटस मागणारा ठराव संमत केला, कारण नाहीतर त्यांना पूर्ण स्वराज्य हे ध्येय ठरवणारा ठराव संमत करावा लागला असता. मग ३१ डिसेंबर १९२९ च्या मध्यरात्रीपर्यंत त्यांनी अशी काही भेट आपल्या पदरात पडते का याची गंभीरतापूर्वक वाट पाहिली. ती न लाभल्यानेच पूर्वी आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांना पूर्ण स्वराज्याचा ठराव संमत करावा लागला. न पेक्षा त्यांना ते नको होते. पण त्यानंतरही महात्माजींनी तडजोडीसाठी दार अजून उघडे आहे हे काही गुपित ठेवले नव्हते. खरी वृत्ती ती होती. सुरुवातीलाच त्यांना पक्के ठाऊक होते की आंदोलनाची सांगता कोणत्या ना कोणत्या तडजोडीतच होणार आहे. हाच तो अर्धवट उत्साहीपणा ज्याचा आम्हाला राग आहे; संघर्षाच्या एखाद्या अवस्थेत एखादी तडजोड करणे याचा आम्हाला राग नाही. असो. आपण चर्चा याची करत होतो की कोणत्या शक्तींच्या आधारे क्रांती होऊ शकते. पण जर तुम्ही शेतकरी व कामगारांकडे जाऊन त्यांचा क्रियाशील पाठिंबा उभा करणार असाल तर मला एक सांगू द्या की ते तुमच्या भावनाविवश बोलण्याने भुलणार नाहीत. ते तुम्हाला परखडपणे विचारणार की ज्या क्रांतीकरता तुम्ही त्यांना त्याग करायला सांगत आहात तिच्यातून त्यांना काय मिळणार आहे? हिंदुस्थान सरकारच्या शिरोभागी लॉर्ड रीडिंग असो वा सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, त्यांना काय फरक पडणार आहे? लॉर्ड आयर्विनची जागा सर तेजबहाद्दूर सप्रूंनी घेतली तर शेतकऱ्याला त्याचे काय हो? त्याच्या राष्ट्रीय भावनेला आवाहन करण्याचा काही उपयोग नाही. तुमच्या उद्दिष्टप्राप्तीसाठी तुम्ही त्याला 'वापरून' घेऊ शकणार नाही. क्रांती ही त्यांची असणार आहे व त्यांच्या भल्यासाठी असणार आहे असे आधी मनोमन तुम्हाला वाटले पाहिजे आणि ते तुम्ही त्यांना समजून सांगितले पाहिजे. सर्वहारा वर्गासाठी, सर्वहारा वर्गाची क्रांती.

जेव्हा तुमच्या ध्येयाची अशी सुस्पष्ट संकल्पना तुम्ही नक्की केलेली असेल तेव्हा तुम्ही उत्साहाने तुमच्या आधारभूत शक्तींना कृतीसाठी संघटित करायला लागू शकाल. आता दोन वेगवेगळ्या टप्प्यांमधून तुम्हाला जावे लागेल. पहिला टप्पा तयारी आणि दुसरा कृती.

सध्याचे आंदोलन संपुष्टात येईल तेव्हा प्रामाणिक क्रांतिकारक कार्यकर्त्यांमध्ये घृणा आणि काहीसे नैराश्य आलेले तुम्हाला आढळून येईल. पण तुम्ही काळजी करण्याची गरज नाही. भावनाविवशता बाजूस सारा. वास्तवाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा. क्रांती ही एक अतिशय अवघड कामगिरी आहे. क्रांती करणे हे कोणाही एका माणसाच्या कुवतीच्या पलीकडचे आहे. तसेच ती एखादी मुहूर्ताची तारीख ठरवूनही घडवून आणता येत नसते. विशिष्ट सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून ती घडत असते. परिस्थितीने अशा समोर ठेवलेल्या संधीचा उपयोग करून घेणे हे सुसंघटित पक्षाचे कार्य असते आणि जनसमुदायांची तयारी करणे व क्रांतीच्या शक्तींना संघटित करणे हे फार अवघड काम असते. त्यासाठी क्रांतिकारी कार्यकर्त्यांना अत्यंत मोठा त्याग करावा लागतो. एक मला स्पष्ट करू द्या–जर तुम्ही एखादे व्यवसाय करणारे असाल किंवा सुस्थिर लौकिक अथवा प्रापंचिक जीवन जगणारे असाल तर कृपा करून या आगीशी खेळू नका. एक नेता म्हणून पक्षाला तुमचा काही एक उपयोग होणार नाही. आपल्याकडे मुबलक नेते आहेत की जे संध्याकाळचे काही तास भाषण करण्यासाठी मोकळे काढतात. त्यांचा काही उपयोग नाही. लेनिनचे शब्द वापरायचे तर आपल्याला 'व्यावसायिक क्रांतिकारकां' ची गरज आहे. अशा पूर्णवेळ कार्यकर्त्याची गरज आहे की क्रांतीव्यतिरिक्त ज्यांना दुसऱ्या कोणत्याही आकांक्षा नाहीत वा आयुष्य नाही. असे जितके जास्त कार्यकर्ते एका पक्षामध्ये संघटित होऊन काम करतील तितकी यशाची शक्यता जास्त.

पद्धतशीरपणे पुढे जायचे तर, सर्वात जास्त जर कशाची गरज असेल तर अशा एका पक्षाची की ज्यात वरील प्रकारचे, सुस्पष्ट विचार असलेले, तीक्ष्ण आकलनबुद्धी असलेले व पुढाकार घेऊन त्वरित निर्णय घेण्याची क्षमता असलेले कार्यकर्ते आहेत. या पक्षाची शिस्त पोलादी असेल. तो भूमिगत पक्षच असायला पाहिजे याची जरूरी नाही. खरे तर उलटेच आहे. तरी आपणहून तुरुंगात जाण्याच्या धोरणामुळे काहींना भूमिगत जीवन जगणे भाग पडेल. त्यांनीही आपले कार्य तेवढ्याच उत्साहाने पार पाडले पाहिजे आणि कार्यकर्त्यांच्या याच गटातून, खरीखुरी संधी येईल तेव्हा उपयोगी पडतील असे तयारीचे कार्यकर्ते निर्माण होतील.

पक्षाला कार्यकर्त्यांची जरूरी आहे आणि फक्त युवक चळवळीतून त्यांची भरती करून घेता येईल. म्हणून युवक आंदोलन हा आपल्या कार्यक्रमाचा प्रारंभबिंदू आहे. युवक आंदोलनाने अभ्यासवर्ग संघटित केले पाहिजेत; व्याख्याने केली पाहिजेत; पुस्तके, पुस्तिका, पत्रके, नियतकालिके प्रकाशित केली पाहिजेत. राजकीय कार्यकर्त्यांची भरती करणे व त्यांना प्रशिक्षण देणे यासाठी हे सर्वोत्तम काम आहे.



जे विचारांनी परिपक्व बनले आहेत व ध्येयासाठी जीवन वाहून टाकण्याची स्वत:ची तयारी आहे असे ज्यांना वाटते आहे अशा युवकांना पक्षामध्ये घेता येईल. पक्षातील कार्यकर्त्यांनी युवक चळवळीला सतत मार्गदर्शन केले पाहिजे व तिचे नियंत्रण केले पाहिजे. पक्षाने आपल्या कामाला जनसमुदायामध्ये प्रचार कार्य करण्यापासून सुरुवात केली पाहिजे. हे अत्यंत आवश्यक आहे. गदर पार्टीच्या (१९१४–१५) प्रयत्नांना अपयश येण्याचे एक मूलभूत कारण म्हणजे जनसमुदायांमधले आंदोलनाविषयीचे अज्ञान, उदासीनता व कधी कधी त्यांनी केलेला सक्रिय विरोध आणि याखेरीजही, शेतकरी–कामगारांची सक्रिय सहानुभूती प्राप्त करून घेणे व त्यांना संघटित करणे यासाठीसुद्धा अशा प्रचारकार्याची गरज आहे.

अशा पक्षाचे नाव कम्युनिस्ट पक्ष असे असायला हवे. राजकीय कार्यकर्त्यांच्या या पक्षाची बांधणी कडक शिस्तीची हवी व त्याने इतर सर्व चळवळींची हाताळणी करायला हवी. त्यालाच शेतकऱ्यांचे व कामगारांचे पक्ष संघटित करावे लागतील, कामगार संघटना उभ्या कराव्या लागतील आणि पुढे काँग्रेस व इतर राजकीय संस्था काबीज करण्याचाही प्रयत्न करावा लागेल. राजकीय जागृती करण्याकरता, केवळ राष्ट्रीयच नव्हे तर वर्गीय राजकारणाच्या जाणीवा निर्माण करण्याकरता, प्रचंड प्रकाशन मोहीम संघटित करावी लागेल. सर्व तऱ्हेच्या प्रश्नावर प्रचार करून समाजवादी सिद्धांताचा प्रकाश जनसमुदायापर्यंत पोचवण्यासाठी पुस्तके सहज उपलब्ध होतील व व्यापक प्रमाणावर प्रसृत होतील हे पाहिले पाहिजे.

कामगार चळवळीत काही मूर्ख कल्पना बाळगणारे काही लोक आहेत; त्यांना असे वाटते की राजकीय स्वातंत्र्य मिळवल्याशिवाय शेतकरी व कामगारांना आर्थिक मुक्ती मिळू शकेल. हे लोक नुसते बडबडे तरी आहेत किंवा त्यांच्या डोक्यात गोंधळ तरी आहे. असले विचार कल्पनेच्याही पलिकडचे व चुकीचे आहेत. आम्हालाही जनतेची आर्थिक मुक्ती हवी आहे आणि त्याचसाठी आम्ही राजसत्ता हाती घेण्याकरता धडपडत आहोत. यात शंका नाही की प्रारंभी आपल्याला या वर्गांच्या लहानसहान आर्थिक मागण्या व सवलती यांच्याकरता लढावे लागेल. पण हे लढे म्हणजे राज्यसत्तेसाठी करायच्या अंतिम लढ्याकरता त्यांना शिक्षण देण्यासाठी अवलंबण्याचा मार्ग आहे, साधन आहे.

या सर्वांशिवाय पक्षाची एक संघटित सैनिकी शाखा असणे आवश्यक आहे. हे अतिशय महत्त्वाचे आहे. काही वेळा अशा येतात की जेव्हा सैनिकी बळाची तीव्र गरज भासते. पण त्यावेळी काही असे दल बांधणे व त्याला पुरेशी साधनसामग्री उपलब्ध करणे तुम्हाला शक्य नसते. कदाचित याच विचारावर अतिशय काळजीपूर्वक स्पष्टीकरण मी करायला हवे. कारण या विषयावरच्या माझ्या विचारांचा चुकीचा अर्थ लावला जाण्याची फार मोठी शक्यता आहे.

दिसायला असे दिसते की मी एखाद्या दहशतवाद्यासारखे वागलो आहे. पण मी दहशतवादी नाही. मी क्रांतिकारक आहे की ज्याने एका दीर्घकालीन कार्यक्रमाविषयी काही निश्चित विचार केलेला आहे. ज्याची चर्चा येथे आपण करत आहोत. माझे साथी ('कॉम्रेड इन आर्म्स') कदाचित रामप्रसाद बिस्मिल यांच्याप्रमाणे माझ्यावर असा आरोप करतील की फाशीच्या कोठडीत दिवस कंठताना माझ्या मनाची काही वेगळीच प्रतिक्रिया झालेली आहे. माझ्या मनाची चलबिचल झाली आहे. पण हे सत्याला धरून होणार नाही. तुरूंगाच्या बाहेर असताना माझ्या ज्या कल्पना होत्या, ज्या निष्ठा होत्या, जी जिद्द व जी प्रेरणा होती ते सर्व आजही तसेच आहे—नव्हे, जास्त चांगल्या प्रकारचे आहे. येथे मी वाचकांना इशारा देऊ इच्छितो की माझे शब्द त्यांनी काळजीपूर्वक वाचावेत. दोन ओळींच्या मध्ये त्यांनी काही दुसरेच वाचण्याचा प्रयत्न करू नये. माझ्या सर्व शक्तीनिशी मी घोषित करतो की मी दहशतवादी नाही, व कदाचित माझ्या क्रांतिकारक जीवनाचा अगदी आरंभीचा काळ वगळला तर मी कधीच दहशतवादी नव्हतो. त्या पद्धतीने आपण काहीही मिळवू शकणार नाही अशी माझी खात्री झाली आहे. हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनच्या इतिहासावरून याचा निवाडा तुम्हाला करता येईल. आमच्या सर्व कार्याचे उद्दिष्ट एकच होते—त्या महान आंदोलनाची सैनिकी शाखा या नात्याने आम्हाला त्या आंदोलनाशी एकरूप व्हायचे होते.

जर माझ्या प्रतिपादनाविषयी कोणी गैरसमज करून घेतले असतील तर त्याने स्वत:चे विचार सुधारून घ्यावे. मला असे म्हणायचे नाही की बॉम्ब आणि पिस्तुले निरुपयोगी असतात. उलट ती उपयुक्तच असतात. पण माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की केवळ बॉम्ब फेकणे हे निरुपयोगीच नव्हे तर कधी कधी हानिकारकही असते. पक्षाच्या सैनिकी शाखेने कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत वापरण्यासाठी जे काही गोळा करता येईल ते सर्व युद्धसाहित्य सदैव सज्ज ठेवले पाहिजे. तिने पक्षाच्या राजकीय कार्याची पाठराखण केली पाहिजे. पण ती स्वतंत्रपणे कार्य करू शकत नाही व तिने तसे करणे योग्य नाही.

या वर दिग्दर्शित केलेल्या मार्गाने पक्षाने आपले काम केले पाहिजे. नियतकालिक बैठका व परिषदा घेऊन पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांचे सर्व विषयांवर शिक्षण व प्रबोधन केले पाहिजे.

जर तुम्ही या धोरणाने काम सुरू करणार असाल तर तुम्ही अत्यंत शांतचित्त व साक्षेपी बनायला हवे. हा कार्यक्रम पूर्ण करायला किमान वीस वर्षे आवश्यक आहेत. 'दहा वर्षात क्रांती' करण्याची तारुण्य सुलभ स्वप्ने दूर फेका. 'एका वर्षात स्वराज्य' मिळवण्याची गांधीजींची मनोराज्ये टाकून द्या. क्रांतीला ना भावनाविवशतेची गरज आहे, ना मृत्यूला कवटाळण्याची. तिला गरज आहे सततच्या संघर्षमय जीवनाची, धीरोदत्तपणे यातना सहन करण्याची आणि त्यागाची. पहिल्या प्रथम तुमची व्यक्तिकेंद्रितता चिरडून टाका. व्यक्तिगत सुखासमाधानाची स्वप्ने गळून



जाऊ द्या. नंतर कामाला सुरुवात करा. तुम्हाला इंचाइंचाने पुढे जावे लागेल. त्यासाठी धैर्याची, चिकाटीची आणि अतिशय दृढ निर्धाराची गरज आहे. मग कोणत्याही अडचणी अन् कोणतेही कष्ट तुम्हाला नाउमेद करणार नाहीत. कोणत्याही अपयशाने व विश्वासघाताने तुम्ही खचणार नाही. तुमच्यावर लादलेल्या कोणत्याही यातनांनी तुमच्यातली क्रांतिकारक जिद्द विझून जाणार नाही. दु:खक्लेशांच्या आणि त्यागांच्या अग्निदिव्यातून तुम्ही विजयी होऊन बाहेर पडाल आणि असला हा प्रत्येक व्यक्तिगत विजय क्रांतीच्या साधनसामुग्रीच्या खजिन्यात पडलेली अमोल भर असेल.

*('मागोवा' प्रकाशित 'आम्ही कशासाठी लढत आहोत' मधून पुनर्मुद्रित.)*

***

***ज्या दिवशी अशा मानसिकतेचे भरपूर स्त्री-पुरुष आपल्याला आढळतील, की जे मानवजातीची सेवा आणि पीडित मानवाची मुक्ती याखेरीज दुसऱ्या कशाही करता आपले आयुष्य वाहून घेऊ शकणार नाहीत, तो दिवस मुक्तीच्या युगाची नांदी ठरेल.***

*– 'मी नास्तिक का आहे', या भगतसिंगच्या प्रसिद्ध लेखातून*

# युवक!

*(भगतसिंगचा हा लेख 'साप्ताहिक मतवाला'–वर्ष २, अंक ३८, १६ मे १९२५–मध्ये प्रसिद्ध झाला होता.)*

यौवनकाल हा मानवी आयुष्यातील वसंत ऋतू आहे. तारुण्याच्या प्राप्तीने माणूस बेभान होतो. हजारो प्याले झोकल्यासारखी नशा चढते त्याला. विधात्याने दिलेल्या सगळ्या शक्ती कंध फुटावा तशा सहस्त्रधारांनी कोसळू लागतात. मदांध मातंगाप्रमाणे निरंकुश, आषाढ–मेघा सारखी उन्मत्त, प्रलयकालीन प्रभंजनाप्रमाणे प्रचंड, वसंतातील नवजात कलिकेसारखी सुकोमल, ज्वालामुखीसारखी उन्मुक्त आणि भैरवीच्या सुरांसारखी मधुर असते ही युवावस्था! उजळलेल्या पहाटेची शोभा, सायंकालची स्निग्धता, ग्रीष्मातल्या मध्यान्हीची तप्तता आणि भाद्रपदी अमावस्येच्या मध्यरात्रीची भीषणता तिच्यात सामावलेली असते–जसा क्रांतिकारकाच्या खिशामध्ये बॉम्ब आणि वीर योद्ध्याच्या हातामध्ये खड्ग तशीच मानवाच्या शरीरात ही तरुणाई! १६ ते २५ या वर्षांमध्ये हाडा–मांसाच्या या संदुकीत जगातले सारे तेज, सारी भीषणता विधात्याने बंद केलेली असते. १० वर्ष ही धाडसी नौका भयंकर तुफानांना तोंड देत, डगमगत मार्गक्रमण करत असते. ही तरुणाई दिसायला सस्यशामल वसुंधरेपेक्षाही सुंदर आहे खरी, मात्र तिच्यात खोलवर भूकंपाची भीषणता दडलेली असते. त्यामुळेच तारुण्यावस्थेत माणसापुढे दोनच मार्ग असतात. तो उतीच्या सर्वोच्च शिखरावर चढू शकतो किंवा अध:पतनाच्या अंधाऱ्या खाईत कोसळू शकतो. त्याने ठरवले तर तो त्यागी बनू शकतो, हवे तर विलासी! तो जसा देवत्वाला पोहोचू शकतो तसा पिशाच्चही बनू शकतो. साऱ्या जगाला तो सळो की पळो करून सोडू शकतो तसे भयंकर संकटांपासून वाचवूही शकतो. जगात युवकांचेच साम्राज्य आहे. युवकांच्या पराक्रमाच्या कहाण्यांनी जगाचा इतिहास समृद्ध आहे. युवकच रणचंडीच्या ललाटीची रेखा आहे, युवकच मायभूमीच्या यश–दुंदुभीचा उच्चारव आहे. तोच तिच्या विजयरथाच्या अग्रस्थानी आहे.

तो महासागराच्या उत्तुंग लाटांसारखा उन्मत्त आहे. महाभारतातील भीष्म पर्वाच्या प्रथम ललकारी सारखा भयावह आहे. पहिल्या वहिल्या चुंबना सारखा रसपूर्ण आहे. तो रावणाच्या अहंकारासारखा बेदरकार आहे. प्रल्हादाच्या सत्याग्रहासारखा दृढ आणि अटळ आहे. कुणाला जर विशाल हृदयाची आवश्यकता असेल, युवकांकड़े मागा. रसिकताही त्याच्याच पाशी सापडेल तुम्हाला आणि भावुकतेवरही त्याच्याच नावाची नोंद आहे. छंद शास्त्राचा गंध नसूनही तो प्रतिभावान कवी आहे. काव्य त्याच्याच हृदय–कमलातला मधुरस आहे. त्याला रसांची परिभाषा ठाऊक नाही, तरीही तो कवितेचा खरा जाणकार आहे. सृष्टीला पडलेले एक न उलगडलेले कोडे आहे युवक! ईश्वराच्या रचनाकौशल्याचा एक उत्कृष्ट नमुना! संध्यासमयी तासन्तास तो नदीकाठावर बसून रहातो, क्षितिजापार जाणाऱ्या रक्तवर्णी



सूर्याकड़े अनिमिष नेत्रांनी पाहात. पलिकडच्या तीरावरून येणाऱ्या हळुवार संगीत लहरींच्या मंद प्रवाहात तल्लीन होऊन! असे विचित्र त्याचे जीवन! अद्भुत त्याचे साहस! अमोघ त्याचा उत्साह!

तो निश्चिंत आहे, बेदरकार आहे. एखाद्या गोष्टीत मन रमले तर रात्र रात्र जागणे त्याला नवीन नाही. ज्येष्ठातली दुपार त्याच्यासाठी चांदणी रात्र आहे, पावसाचा वर्षाव म्हणजे पुष्पवृष्टी आणि स्मशानातील नीरवता जणू उद्यानातील पाखरांचा गुंजारव! तो मनात आणेल तर साऱ्या समाजाला हलवून सोडेल, अवघ्या देशाचे भले करेल, साऱ्या राष्ट्राचे वर्तमान उज्वल करेल, मोठमोठी साम्राज्ये उलथून टाकेल. पतितांचे उत्थान करणे, साऱ्या जगाला प्रगतीपथावर नेणे त्याच्याच हातात आहे. या विशाल विश्वाच्या रंगभूमीवरचा तो एक कुशल रंगकर्मी आहे.

रक्ताची भेट हवी असेल तर युवकाशिवाय बाकी कोण देईल? तुम्हाला बलिदान हवे असेल तर युवकांकडेच मागावे लागेल. प्रत्येक समाजाचा भाग्य विधाता युवकच तर असतो. एक पाश्चात्य विचारवंत म्हणतो ते ठीकच आहे, "It is an established truism that young men of today are the countrymen of tommorrow, holding in their hands the high destinies of the Land. They are the seeds that spring & bear fruit" भावार्थ असा की आजचे युवक उद्याच्या देशाचे भाग्य घडवणार आहेत, तेच भविष्यातील सफलतेचे बीज आहेत.

जगाच्या इतिहासाची पाने उघडून पहा, युवकांच्या रक्ताने लिहिलेले अमर संदेश आढळतील! जगातल्या साऱ्या क्रांत्यांची, स्वातंत्र्य युद्धांची वर्णने पाहा, त्यात केवळ ते युवकच भेटतील, ज्यांना बुद्धिवंतांनी माथेफिरू, वाट चुकलेले म्हणून हिणवले आहे. पण जे सुरक्षित किल्ल्यात बसले आहेत त्यांना काय कळणार किल्ल्याच्या खंदकांवर स्वत:च्या शरीराचे पूल तयार करणारे जपानी युवक कोणत्या पोलादापासून बनले होते! खरा युवक जराही न अडखळता हसत हसत मृत्यूला अलिंगन देतो! तीक्ष्ण संगिनींसमोर छाती काढून ठाम उभा रहातो. तोफेच्या तोंडीही हसतमुख रहातो, बेडयांच्या तालात राष्ट्रप्रेमाचे गाणे गातो आणि फाशीच्या तख्तावर हट्टाने आरूढ होतो. फाशीच्या दिवशी त्याच्या शरीरावर मूठभर मांस चढलेले असते. तुरुंगातल्या चक्कीवर युवकच प्रकाशाचे मंत्र म्हणतो, काळकोठडीच्या अंधारात विलीन होऊनच तो मायभूमीला अंधारातून बाहेर काढतो. अमेरिकेतील युवक दलाचा नेता पेट्रिक हेन्री एकदा म्हणाला होता "Life is dear outside the prisonwalls, but it is immeasurably dearer within the prisoncells, where it is the price paid for the freedom's fight" म्हणजे तुरुंगाच्या भिंतीबाहेरचे आयुष्य मोलाचे आहे, पण कोठडी मधले आयुष्य तर फारच मौल्यवान आहे, कारण ती स्वातंत्र्यासाठीच्या लढाईची किंमत आहे.

असा जिवंत नेता आहे म्हणूनच अमेरिकेतील युवकांमध्ये साहस आहे अशी ज्वलंत घोषणा करण्याचे : "We believe that when a Government becomes

destructive of the natural right of man, it is man's duty to destroy that Government" म्हणजे आमचा असा विश्वास आहे की जेव्हा सत्ताधारी मानवाच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे वर्तन करू लागतात तेव्हा त्या सत्तेचा विनाश करणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे.

हे भारतीय तरुणा, तू का असा मरगळून, अलिप्तपणे झोपला आहेस! उठ, डोळे उघड, पहा, पूर्व दिशा केव्हाच उजळली आहे. आता आणखी झोपून राहू नको, झोपायचेच असले तर अनंत निद्रेच्या कुशीत जाऊन झोप, असा भ्याडासारखा का झोपतोस? माया, मोह, ममतेचा त्याग कर आणि गर्जून सांग.

Farewell, Farewell, My True Love,
The army is on the move,
And if I stayed with you love,
A coward I shall prove.

तुझी पूजनीय, वंदनीय माता, तुझी मायभूमी, ती जगदंबा, अपूर्णा, त्रिशूलधारिणी, सिंहवाहिनी, सस्यश्यामला आज रडते आहे. तिची असहायता पाहून तुझे मन विदीर्ण होत नाही का? धिक्कार असो तुझ्या निर्जीवतेचा! तुझी नपुंसकता पाहून तुझ्या पूर्वजांच्या माना शरमेने झुकल्या आहेत. अजूनही तुझ्या अंगी थोडीशी लाज शिल्लक असेल तर, आईच्या दुधाची लाज राख, तिच्या उद्धाराचा विडा उचल. तिच्या अश्रूंच्या प्रत्येक थेंबाची आण घे, तिला मुक्त कर आणि बोल मुक्तकंठाने, वंदे मातरम्!

***

***क्रांतीला ना भावनाविवशतेची गरज आहे, ना मृत्यूला कवटाळण्याची. तिला गरज आहे सततच्या संघर्षमय जीवनाची, धीरोदत्तपणे यातना सहन करण्याची आणि त्यागाची. पहिल्या प्रथम तुमची व्यक्तिकेंद्रीतता चिरडून टाका. व्यक्तिगत सुखासमाधानाची स्वप्ने गळून जाऊ द्या. नंतर कामाला सुरुवात करा. तुम्हाला इंचाइंचाने पुढे जावे लागेल. त्यासाठी धैर्याची, चिकाटीची आणि अतिशय दृढ निर्धाराची गरज आहे. मग कोणत्याही अडचणी अन् कोणतेही कष्ट तुम्हाला नाउमेद करणार नाहीत.***



# घराला राम राम : वडिलांच्या नावे पत्र

*(सन १९२३ मध्ये भगतसिंग लाहोरच्या नॅशनल कॉलेज मध्ये शिकत होता. जनजागृतीसाठी नाट्य क्लबातही तो भाग घेत असे. तेथेच क्रांतिकारक प्राध्यापक आणि सहकाऱ्यांच्या तो संपर्कात आला. भारताला स्वतंत्र कसे करावे? याबद्दल त्यांच्यामध्ये तासन्तास अभ्यास आणि चर्चा–वादविवाद चालत असे.*

*घरी आजीने त्याच्या लग्नाबद्दल बोलणी सुरु केली. त्यांच्यासमोर आपले काही चालत नाही असे लक्षात आल्यावर भगतसिंगने वडिलांच्या नावे चिठ्ठी लिहिली आणि घर सोडले. त्यानंतर गणेश शंकर विद्यार्थी यांच्याकडे कानपूरला जाऊन 'प्रताप' या नियतकालिकामध्ये काम सुरू केले. तेथे बी. के. दत्त, शिव वर्मा, विजयकुमार सिन्हा अशा क्रांतिकारक सहकाऱ्यांशी त्याचा परिचय झाला. त्याचे घर सोडून कानपूरला जाणे हे क्रांतिकार्याच्या मार्गावरचे महत्त्वाचे पाऊल ठरले.*

*वडिलांच्या नावे लिहिलेली ही चिठ्ठी भगतसिंगचे घर सोडण्याबद्दलचे विचार स्पष्ट करते.)*

पूज्य पिताजी,

नमस्ते.

मी माझे सारे आयुष्य भारताच्या स्वातंत्र्यासाठी वाहिले आहे. तेच माझ्या जीवनाचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच माझ्या आयुष्यात आता ऐषाराम, संसारसुखाचे आकर्षण अशा गोष्टींना स्थान नाही.

आपल्याला आठवत असेल, लहानपणी माझ्या मुंजीच्या वेळी बापूजींनी मला देशसेवेसाठी वाहिले असल्याचे जाहीर केले होते. त्या वेळी केलेली प्रतिज्ञा मी आता पूर्ण करत आहे.

आपण मला माफ कराल अशी आशा आहे.

आपला आज्ञाधारक
भगतसिंग

***

# विद्यार्थी आणि राजकारण

*(या महत्त्वाच्या राजकीय विषयावरचा हा लेख जुलै १९२८ च्या 'किरती' मध्ये छापला गेला होता. त्या वेळी अनेक पुढारी विद्यार्थ्यांना राजकारणात भाग न घेण्याचा सल्ला देत असत. त्यांना उत्तर देणारा हा लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. हा लेख 'संपादकीय' मध्ये छापला गेला आणि तो भगतसिंगनेच लिहिला असावा असे मानले जाते.)*

तरुण विद्यार्थ्यांनी राजकारणात किंवा राजकीय कार्यात भाग घेऊ नये अशा मताचा गलबला हल्ली फार वाढला आहे. विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश घेतानाच 'राजकीय कार्यात भाग घेणार नाही' अशा आशयांच्या अटींवर सह्या करायला भाग पाडले जाते. पंजाब सरकारची ही तऱ्हा अगदीच न्यारी आहे. त्या पलीकडे जाऊन, लोकांनीच निवडून पाठवलेला मनोहर आता शिक्षणमंत्री झाल्यावर, 'विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी राजकारणात भाग घेऊ नये' अशी परिपत्रके शाळा–कॉलेजच्या नावे काढतो हे आमचे दुर्भाग्य. काही दिवसांपूर्वीच लाहोरमध्ये स्टुडंट्स युनियन तर्फे विद्यार्थी–सप्ताह साजरा केला गेला. तेथे सुद्धा सर अब्दुल कादर आणि प्रा. ईश्वरचंद्र नंदा यांनी 'विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घेऊ नये' याच मतावर भर दिला.

पंजाबला राजकीयदृष्ट्या मागासलेला समजण्यात येते. याचे कारण काय आहे? पंजाबने आजवर थोडी बलिदाने केली आहेत काय? की कमी संकटे झेलली आहेत? तरी देखील राजकीय मैदानात आम्ही इतके मागे का? याचे कारण अगदी स्पष्ट आहे. आमच्या शिक्षणखात्याचे अधिकारी बुद्धू आहेत. आता पंजाब कौन्सिलचा कारभार पाहून याची कारणे अधिक स्पष्टपणे जाणवतात. आम्हाला देण्यात येणारे शिक्षण कुचकामी आणि फालतू असते. विद्यार्थी आणि तरुणांना आपल्या देशाच्या कारभारात काडीमात्रही रस नसतो. त्याबद्दल त्यांना कसलेही ज्ञान नसते. जेव्हा शिकून ते बाहेर पडतात, तेव्हा त्यापैकी मोजके लोकच पुढे आणखी टिकू शकतात. असे लोक राजकारणाबद्दल अशी मूर्खासारखी मते नोंदवतात की त्यांना स्वत:च्या कपाळावर हात मारून घेण्याशिवाय काही गत्यंतर नसते. ज्या तरुणांना उद्या या देशाची धुरा हाती घ्यायची आहे, त्यांना आजपासून आंधळे अनुयायी बनवायचा उद्योग सुरू आहे. याचा परिणाम काय होईल हे आपण समजून घ्यायला हवे.

विद्यार्थ्यांचे मुख्य कर्तव्य शिक्षण घेणे हे आहे. आपले संपूर्ण लक्ष त्यांनी अभ्यासात गुंतवायला हवे. परंतु देशातल्या परिस्थितीचे ज्ञान आणि त्यात सुधारणा करण्याचे उपाय यावर विचार करण्याची क्षमता निर्माण करणे याचा मात्र या शिक्षणात समावेश होत नाही, असे का? आणि असेच असेल तर अशा शिक्षणाला आम्ही कुचकामी समजतो. फक्त कारकुनी करायलाच शिकायचे असेल तर अशा शिक्षणाची आवश्यकताच काय? काही अतिचलाख मंडळी असेही म्हणतात, "तुम्ही राजकीय



गोष्टी शिका. त्यावर विचार करा, मात्र आत्ताच व्यावहारिक राजकारणात भाग मात्र घेऊ नका कारण तुम्ही आणखी शिकून लायक बनून उद्या देशाची सेवा करणे हेच देशाच्या फायद्याचे आहे."

ही बतावणी कानाला फारच गोड लागते. पण तीही आम्ही निकालात काढतो. ही बतावणी अगदी वरवरची आहे हे स्पष्ट करणारे एक उदाहरण पाहू . 'एके दिवशी एक विद्यार्थी Apeal to the young, Prince Kropotkin (*नवयुवकांना आवाहन* , प्रिन्स क्रोपोटकिन) हे पुस्तक वाचत होता. ते पाहून एका प्राध्यापक महाशयांनी विचारले, "हे कसले पुस्तक आहे? आणि वरचे नाव तर बंगाली वाटतेय?" विद्यार्थी म्हणाला, "प्रिन्स क्रोपोटकिन हे फारच प्रसिद्ध नाव आहे. ते अर्थशास्त्रातील विद्वान होते." खरे तर प्रत्येक प्राध्यापकाला माहिती असायला हवे असेच हे नाव होते. प्राध्यापकांच्या लायकीवर तो विद्यार्थी हसला आणि पुढे म्हणाला, "ते रशियन होते." बस्स! 'रशियन!' हा शब्द ऐकल्यावर प्राध्यापक महाशयांच्या डोक्यावर वीजच कोसळली. ते गरजले, "तू बोल्शेविक आहेस कारण तू राजकीय पुस्तके वाचतोस."

अशा लायकीच्या प्राध्यापकांकडून बिचारे विद्यार्थी तरी काय शिकणार?

दुसरा मुद्दा—व्यावहारिक राजकारण म्हणजे काय? महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांचे स्वागत करायचे आणि भाषणे ऐकायची. हे झाले व्यावहारिक राजकारण. मग कमिशनचे किंवा व्हॉईसरॉयचे स्वागत करणे हे काय आहे? त्याच नाण्याची दुसरी बाजू नाही काय? शासन, देशाची व्यवस्था यांच्याशी संबंधित कोणतीही गोष्ट राजकारणाच्याच अखत्यारीत येते ना? मग तेही राजकारण नाही काय? त्यावर असे सांगितले जाईल की एकाने सरकार खुश होते तर दुसऱ्याने नाराज. मग हा प्रश्न सरकारच्या खुशीचा अथवा नाराजीचा झाला. म्हणून विद्यार्थ्यांनी जन्मल्याबरोबरच खुशामतीचे धडे गिरवायला हवेत? आम्ही तर असे समजतो की जो पर्यंत हिंदुस्थानात विदेशी डाकू राज्य करत आहेत, तोवर त्यांच्याशी प्रामाणिक राहणारे लोक प्रामाणिक नसून गद्दारच आहेत, माणूस नव्हे तर पशू आहेत, पोटार्थी गुलाम आहेत. त्यांच्याकडून प्रामाणिकपणाचे धडे विद्यार्थ्यांनी घ्यावेत हे सांगण्यात काय अर्थ आहे?

आजच्या काळात देशाला तन–मन–धन अर्पण करणाऱ्या आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी झपाटलेपणाने आपले सारे आयुष्य झोकून देणाऱ्या देश सेवकांची हिंदुस्थानाला गरज आहे हे आज सर्वमान्य आहे. अशी माणसे म्हाताऱ्यांमधून पुढे येणार आहेत काय? कुटुंब आणि संसाराच्या रामरगाड्यात अडकलेल्यांमधून असे लोक मिळतील? जे कोणत्याही जंजाळात अडकलेले नाहीत असे नवयुवकच अशा कार्यासाठी पुढे येऊ शकतात. जर त्यांनी काही व्यावहारिक ज्ञान मिळवले असेल तर जंजाळात पडण्यापूर्वीच विद्यार्थी विचार करू शकतील. गणित आणि भूगोलांचे नुसते

पेपर लिहिण्यासाठी घोकंपट्टी केलेल्या विद्वानांकडून आपण अशी अपेक्षा करू शकत नाही.

इंग्लंडच्या सर्व विद्यार्थ्यांनी कॉलेज सोडून जर्मनी विरुद्ध लढायला उतरणे हे राजकारणच नव्हते का? तेव्हा उपदेशकर्ते कुठे होते? की ज्यांनी त्यांना सांगितले असते की जा जाऊन शिक्षण घ्या. आज अहमदाबादच्या नॅशनल कॉलेजचे जे विद्यार्थी बार्डोली सत्याग्रहींना मदत करत आहेत. ते असे मूर्ख राहतील का? बघू, त्यांच्या तुलनेत पंजाब विश्वविद्यालय किती योग्यतेची माणसे निर्माण करतेय? सर्व देशांना स्वतंत्र करणारे हे तिथले विद्यार्थी आणि नवयुवकच असतात. हिंदुस्थानातील नवयुवक यापासून वेगळे राहून स्वत:चे आणि देशाचे अस्तित्व राखू शकतील? १९१९ मध्ये झालेले अत्याचार नवयुवक विसरू शकत नाहीत. त्यांना हेही माहित आहे की एका जबरदस्त क्रांतीची आता आवश्यकता आहे. त्यांनी शिकावे, जरूर शिकावे. पण बरोबरीने राजकारणाचे ज्ञान ही मिळवावे आणि जेव्हा गरज पडेल तेव्हा मैदानात उडी मारून आपले आयुष्य देश कार्यासाठी झोकून द्यावे. आपले प्राण पणाला लावावेत. अन्यथा वाचण्याचा कोणताही उपाय नाही.

***

***"साम्राज्यवाद्यांचे भारतीय चमचे साम्राज्यवादी शोषणावर आधारलेल्या आर्थिक व्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत. साम्राज्यवादी व त्यांच्या या चमच्यांना हाकलून लावून भारतीय श्रमिकांना पुढे जायचे आहे.***

***गोऱ्यांच्या पिळवणुकीच्या जागी काळयांची पिळवणूक आणून आमच्या यातनांमध्ये भर घालण्याची आमची इच्छा नाही."***

*(फाशीवर जाण्याच्या काही दिवस अगोदर भगतसिंगाने तुरुंगातून 'नवयुवक राजकीय कार्यकर्त्यांच्या नावाने' लिहिलेल्या पत्रामधून.)*



# तुरुंगातून वडिलांना पत्र

*(३० सप्टेंबर ,१९३० ला भगतसिंगचे वडील सरदार किशनसिंग यांनी ट्रिब्युनलला एक अर्ज देऊन बचाव सादर करण्याची संधी देण्याची मागणी केली. सरदार किशनसिंग स्वत: देशभक्त होते. ते राष्ट्रीय आंदोलनात भाग घेऊन वारंवार तुरुंगातही जात. बचाव सादर केला तर कदाचित भगतसिंगला फाशी जाण्यापासून वाचवता येईल असे त्यांना आणि इतर काही देशभक्तांना वाटत होते. परंतु भगतसिंग आणि त्याचे साथीदार यांनी अगदी वेगळे धोरण अवलंबिले होते. त्यांच्या मतानुसार न्याययंत्रणा ही बुजगावणे असून ब्रिटिश सरकार सूडबुद्धीने वागत आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारे शिक्षा देण्यापासून त्यांना रोखता येणार नाही. अशा वेळी कमकुवतपणा दाखवला तर लोकांच्या मनात अंकुरलेले क्रांतीचे बीज रूजणार नाही, अशीही भगतसिंगची भावना होती. वडिलांनी केलेल्या अर्जामुळे भगतसिंग दुखावले गेले तरीही भावनांवर नियंत्रण ठेवून आपल्या तत्त्वांवर भर देऊन त्यांनी ४ ऑक्टोबर ,१९३० ला हे पत्र लिहिले. वडिलांना ते उशीरा मिळाले. त्यापूर्वीच ७ ऑक्टोबर ,१९३० ला खटल्याचा निकाल जाहीर झाला.)*

४ ऑक्टोबर, १९३०

पूज्य पिताजी,

तुम्ही माझ्या बचावासाठी स्पेशल ट्रिब्युनलला निवेदन पाठवलेत हे समजल्यावर मी हैराण झालो आहे. ही बातमी इतकी यातना देणारी आहे की मी शांत राहून सहन करू शकलो नाही. या बातमीने माझी मन:शांती नष्ट झाली असून मनात खळबळ माजली आहे. वर्तमान परिस्थितीत आणि या बाबतीत आपण असे निवेदन कसे काय देऊ शकता? हे मला अजूनही उलगडलेले नाही. मुलगा या नात्याने मी तुमच्या पितृप्रेमाच्या भावनांचा आणि इच्छांचा पूर्ण आदर करतो. तरीही माझ्याशी सल्ला मसलत केल्याशिवाय असे निवेदन देण्याचा तुम्हाला कोणताही अधिकार नव्हता असे मला वाटते. राजकीय क्षेत्रातील माझे विचार तुमच्यापेक्षा पूर्णपणे वेगळे आहेत हे तुम्ही जाणताच. त्यामुळे तुमच्या सहमतीची किंवा असहमतीची पर्वा न करता मी कायमच स्वतंत्रपणे काम करत आलो आहे.

मी आपला खटला व्यवस्थित लढवावा आणि आपला बचाव सादर करावा ही गोष्ट माझ्या गळी उतरवण्याचा तुम्ही सुरुवातीपासून प्रयत्न करत होता हे तुमच्या लक्षात असेलच. त्या गोष्टीला मी कायमच विरोध केला, हेही तुम्हाला ठाऊक आहे. मी कधीही स्वत:चा बचाव करण्याची इच्छा दाखवलेली नाही. त्यामुळे कायमच अशा सल्ल्याकडे दुर्लक्ष केले आहे.

आम्ही एक निश्चित धोरण अनुसरून हा खटला लढतो आहोत हे तुम्ही जाणताच. माझे प्रत्येक पाऊल हे धोरणे, माझी तत्त्व आणि आमचा कार्यक्रम

याप्रमाणे पडायला हवे. सध्या परिस्थिती अतिशय वाईट आहे. पण ती यापेक्षा बरी असती तरी बचाव सादर करणाऱ्यांमध्ये मी सर्वांत शेवटी असतो. या संपूर्ण खटल्यामध्ये माझ्यासमोर एकच विचार होता. तो असा–आमच्या विरुद्ध कितीही जालीम आरोप ठेवले असले तरी त्याबद्दल निश्चिंतपणे वागायचे. यामागील माझा दृष्टिकोन असा आहे की, सर्वच राजकीय कार्यकर्त्यांनी अशा परिस्थितीत बेफिकीरी दाखवून त्यांना जी कठोर शिक्षा मिळेल ती हसत हसत सहन करायला हवी. या संपूर्ण खटल्यात आमची योजना याच धोरणाप्रमाणे चालू आहे. त्यात आम्ही यशस्वी झालो की नाही हा निवाडा करणे माझे काम नाही. आम्ही स्वार्थत्याग करून आपले काम करत आहोत.

व्हॉईसरॉयने लाहोर कटाच्या प्रकरणी जे वक्तव्य दिले होते त्यात त्याने असे म्हटले होते की–या कटातले आरोपी शांतता, सुव्यवस्था आणि कायद्याचे राज्य संपुष्टात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. या वक्तव्यामुळे आम्हाला ही बाब जनतेसमोर मांडायची संधी उपलब्ध झाली आहे. आता जनतेलाच हे ठरवू द्या की शांतता आणि सुव्यवस्था व कायदा संपुष्टात आणण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत की आमचे विरोधक? यावर मतभेद होऊ शकतात. कदाचित तुम्ही सुद्धा वेगळ्या मताचे असू शकता तरीही याचा अर्थ असा नव्हे की माझ्याशी चर्चा केल्याशिवाय तुम्ही हे पाऊल उचलावे. तुम्हाला वाटते तितके माझे आयुष्य मौल्यवान नाही. किमान, तत्त्वांना तिलांजली देऊन वाचवले जावे इतके तरी माझ्या दृष्टीने ते महत्त्वाचे नाही. माझ्या शिवाय माझे इतर साथीदारही माझ्या बरोबर आहेत. माझ्या इतकेच त्यांचेही खटले गंभीर आहेत. आम्ही एक संयुक्त योजना अंगिकारली आहे आणि या योजनेवर आम्ही मरेपर्यंत अटळ राहू. आम्हाला व्यक्तिश: त्याचे काय मोल चुकवावे लागेल याची आम्हाला अजिबात फिकीर नाही.

पिताजी, हे लिहिताना मला अतिशय दु:ख होतेय. तुमच्यावर टीका करताना किंवा तुमच्या कृत्याची निंदा करताना मी सभ्यतेच्या पायऱ्या ओलांडणार तर नाही ना किंवा माझे शब्द जास्त कडक तर होणार नाही ना अशी मला भीती वाटते. तरीही मी माझे म्हणणे स्पष्ट शब्दांत मांडतो आहे. जर कोणी इतर व्यक्ती माझ्याशी असे वागली असती तर मी तिला गद्दार मानले असते, पण तुमच्या बाबतीत मी एवढेच म्हणू शकतो की हा तुमचा कमकुवतपणा आहे–अगदी खालच्या पातळीवरचा कमकुवतपणा.

आपल्या सर्वांच्याच परीक्षेची ही वेळ होती. पण या परीक्षेत तुम्ही नापास झालेले आहात. मला ठाऊक आहे की तुम्हीही इतरांप्रमाणे देशभक्त आहात. तुम्हीही आपले आयुष्य स्वातंत्र्यासाठी पणाला लावलेले आहे. पण या महत्त्वाच्या टप्प्यावर तुम्ही असा कमकुवतपणा दाखवला आहे. त्याची कारणे मी समजू शकत नाही.

शेवटी मी तुम्हाला, तुमच्या इतर मित्रांना, तसेच माझ्या खटल्यात रस घेणाऱ्या सर्वांना सांगू इच्छितो की तुमचे हे पाऊल मला मंजूर नाही. मी आजदेखील



न्यायालयात कोणताही बचाव सादर करण्याच्या बाजूचा नाही. जर न्यायालयाने आमच्या काही साथीदारांनी केलेले बचावाचे स्पष्टीकरण मंजूर केले असते तरीही मी तसे स्पष्टीकरण दिले नसते.

उपोषणाच्या दिवसांत ट्रिब्यूनलला मी निवेदन दिले होते, त्याचा चुकीचा अर्थ लावून, 'मी स्वत: सफाई देऊ इच्छितो,' असं काही वर्तमानपत्रात जाहीर केले गेले. खरे तर मी सदैव सफाई सादर करायच्या विरोधात आहे. आजही मी तसेच मानतो.

बोर्स्टल जेल मधील माझे साथीदार तुमच्या या कृतीला माझी गद्दारी आणि विश्वासघात समजत असतील. मला त्यांच्यासमोर माझी बाजू मांडण्याची, आपली स्थिती स्पष्ट करण्याची संधी सुद्धा मिळू शकणार नाही.

यासंदर्भात जे गैरसमज निर्माण झाले आहेत त्यांचे निराकरण करण्यासाठी आणि सत्य जनतेसमोर यावे यासाठी हे पत्र आपण ताबडतोब प्रकाशित करावे अशी प्रार्थना मी तुम्हाला करत आहे.

आपला आज्ञाधारक
भगतसिंग
***

***"We believe that when a Government becomes destructive of the natural right of man, it is man's duty to destroy that Government" म्हणजे आमचा असा विश्वास आहे की जेव्हा शासन मानवाच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे वर्तन करू लागते तेव्हा त्या शासनाचा विनाश करणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे.***

## वर्गीय हितसंबंधांचा आंदोलनावरील प्रभाव

*(सप्टेंबर १९२८ च्या 'किरती' मध्ये 'एक निर्वासित' या नावाने एक लक्षवेधक लेख प्रसिद्ध झाला होता. लेखक होते लाला हरदयाळ. या लेखाचा भगतसिंग व त्याच्या सहकाऱ्यांनी फारच बारकाईने विचार केला होता.)*

जगातील सर्व तत्त्वज्ञान व बंधुभावाचे उपदेश यामध्ये अनेक विसंगती आणि गोंधळ आहेत. तरीही यातून एक गोष्ट स्पष्टपणे समोर येते की मानवसमाज हा अनेक वर्गांमध्ये विभागला गेला आहे. मानवजातीची खरीखुरी सेवा करणाऱ्याला ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाही. हे नजरेआड करणे म्हणजे खगोलशास्त्राच्या वैज्ञानिक माहितीकडे दुर्लक्ष करणाऱ्या भोंदू ज्योतिष्याइतकेच मूर्खपणाचे ठरेल. इथल्या प्रत्येक माणसाला, अगदी आंधळ्याला सुद्धा हे माहीत असते की या जगात श्रीमंत आणि गरीब असे दोन वर्ग आहेत. जगातल्या सर्व भाषांमध्ये ह्या दोन्ही वर्गांचे वर्णन करणारे अनेक शब्द प्रचलित आहेत. उदा. मालक आणि नोकर, जमीनदार आणि मजूर, शासक आणि प्रजा, भांडवलदार आणि कामगार इ. हे शब्द जगातील सारा बंधुभाव नष्ट करणाऱ्या क्रूरतेची आठवण करून देतात.

जगात अनेक प्रकारचे वर्ग अस्तित्वात आहेत. पण प्रकर्षाने जाणवणारे वर्ग दोनच—एक जो शारीरिक श्रम करून पोट भरतो आणि दुसरा—जो कुठल्याही प्रकारचे शारीरिक श्रम न करता जगतो. खाणीत आणि कारखान्यात काम करणारे कामगार, शेतकरी वगैरे श्रमजीवी वर्गामध्ये मोडतात आणि ज्यांना कुठेच काहीही काम करावे लागत नाही ते दुसऱ्या वर्गात मोडतात. ह्या जगात ह्या दोनच जाती. हे दोनच वर्ग. यापेक्षा वेगळे विभाजन करणे हे चुकीचेही आहे आणि हानिकारकही आहे.

आपण नेहमीच पहातो की कष्टकरी व्यक्तीची इच्छा असते की आपल्या मुलाने भरपूर प्रगती करावी आणि कष्टकरी वर्गातून बाहेर पडून आराम करणाऱ्या वरच्या वर्गात सामील व्हावे.

जगात कुठेही हेच दिसते की सुतार, लोहार, शेतकरी ह्यांच्यासारख्या कष्ट करणाऱ्या लोकांपेक्षा मंत्री, वकील, न्यायाधीश, प्रोफेसर, जमीनदार, सावकार हे कायमच जास्त कमावत असतात. ह्या लोकांना एकत्र करू शकेल अशी कोणतीही शक्ती नाहीये. अशा कष्ट न करणाऱ्या लोकांसाठी 'पांढरपेशा' हा शब्द वापरला जातो. आयुष्यातल्या सगळ्या सुखसोयी, ऐषोआराम, शिक्षण, आरोग्य, कला वगैरे पैशाच्या जोरावरच मिळवता येते. गरिबांना बकाल वस्त्यांमध्ये राहून बकाल आयुष्य कंठावे लागते. मजुरांना अहोरात्र पोटापाण्यासाठी घाम गाळत राहावा लागतो. शिक्षण घेण्यासाठी लागणारा वेळही त्यांच्याजवळ नसतो आणि तथाकथित विद्वान आणि श्रीमंत मात्र सुग्रास जेवणावर ताव मारत असतात, पार्ट्या झोडतात, मोठमोठ्या गाड्यांमधून फिरतात, रेशमी वस्त्रे घालतात. अशा अनेक प्रकारांनी चैनचे जीवन जगत असतात.



मग अर्थातच प्रश्न पडतो की ही परिस्थिती निर्माणच कशी झाली? कपडे शिवणारे, कपडे विकणारे, शेती करणारे, गिरणीत काम करणारे ह्या सर्वांचे उत्पन्न कमी कसे? आणि जे केवळ लेक्चर्स देतात, खटले चालवतात, न्याय देतात, शासन चालवतात किंवा बाकी काहीही न करता नुसतेच 'तथास्तु' म्हणतात ह्यांचे उत्पन्न त्यांच्यापेक्षा इतक्या पटींनी जास्त कसे? थोडा विचार केला तर लक्षात येते की समाजाला कायदा किंवा सरकार, धर्म किंवा सावकार किंवा जमीनदार (हे जमिनीचे मालक तर बनले आहेत पण करत काहीच नाहीत) यांच्यापेक्षा शेतीवाडी, कारागिरी करणाऱ्यांचीच जास्त गरज आहे. तरीही काही तास फक्त खुर्चीवर बसून काही लोकांना तुरुंगात पाठवणाऱ्याला, गहू पिकवणाऱ्या शेतकऱ्यापेक्षा किंवा चपला शिवणाऱ्या चांभारापेक्षा जास्त पगार का मिळतो? एक राजा किंवा न्यायाधीश किंवा सावकार, कष्टकरी लोकांपेक्षा असे कोणते महत्त्वाचे, चांगले आणि उपयोगी काम करतो? कित्येक लोक अहोरात्र मेहनत करूनही स्वत:च्या जरुरीपुरतीही कमाई करू शकत नाहीत. एखादा माणूस—मग तो हिंदू/मुसलमान/ख्रिश्चन कोणीही असो—आरामात घोरत पडतो आणि दुसरा मात्र त्याला वारा घालत बसतो असे का? जे लोक अन्नधान्य, दूध, फळे, भाजीपाला पिकवण्याचे काम न करता फक्त त्याचा लाभच घेतात, बिचाऱ्या शेतकऱ्यांच्या मेहनतीचा फायदाच उठवतात, त्या ऐतखाऊंनाच खरेतर वारा घालायचे काम नको का द्यायला? ही गोष्ट समजायला कोणत्याही तत्त्वज्ञानाची गरज नाहीये. काही लोक समाजात गहू पिकवत नाहीत, कापूस पिंजून कपडा विणत नाहीत, तरीही भाकरी खातात आणि कपडे घालतात. याचा सरळ अर्थ हा आहे की गहू पिकवणाऱ्या आणि कपडे विणणाऱ्या कष्टकरी माणसाच्या कष्टातूनच ते हा वाटा बळकावतात. परंतु जेव्हा हे दिसते की शेती करणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्याला, ह्या ऐतखाऊ लोकांसारखे चांगले अन्न मिळत नाही, तेव्हा मनात विचार येतोच की या व्यवस्थेमध्ये कुठे ना कुठे फसवणूक आहे, अन्याय आहे, चूक आहे. मात्र हा प्रश्न 'संपूर्ण तत्त्वज्ञान संग्रह' वाचून सोडवता येणार नाही. आरोग्याचा आणि चांगले जगण्याचा प्रश्न बाजूला ठेवून आज आम्हाला एक त्याहून मोठा प्रश्न विचारायचा आहे की जगात हे जे दोन पक्ष आहेत—एका बाजूला श्रीमंत, बुद्धिवादी, आळशी आणि फुकटचंबू; दुसऱ्या बाजूला गरीब, कष्टकरी अडाणी जे जगातील सर्व संपत्ती निर्माण करतात—यातील हा दुसरा वर्ग अस्तित्वात कशा रीतीने आला? या वास्तव प्रश्नाकडे दुर्लक्ष करणारी जगातील तमाम आंदोलने कुचकामी, फालतू, एवढेच काय तर धोकादायक आहेत—मग ती धार्मिक असोत, समतावादी असोत, आर्थिक असोत वा राजकीय, राष्ट्रीय असोत वा आंतरराष्ट्रीय!

जर ही सर्व आंदोलने एकत्र आली तर जगातील सर्व लोक—एका देवाची लेकरे, एक जातीची, एक धर्माची होतील. तरी हे दोन पक्ष शिल्लक राहतातच—गरीब आणि श्रीमंत. कधी परोक्ष तर कधी अपरोक्षपणे श्रीमंत हे गरिबांचे शत्रूच असतात. कारण गरिबांनी रक्त ओकून निर्माण केलेली संपत्तीच त्यांनी हिसकावून घेतलेली असते.

त्यांना ते आकाशातून पडलेले बक्षीस नसते किंवा त्यांच्याकड़े परीसही नसतो. खरे तर उत्पादनात काडीचाही सहभाग नसताना राजा, मंत्री आणि न्यायाधीश हे सुखाने राहत असतात. कारण बिचारा शेतकरी कायम कर भरत राहतो. जमीनदार रिकामटेकड्यासारखे बसून ऐषाराम आणि बदमाशी करत आयुष्य घालवू शकतो; कारण गरीब शेतमजूर शेतसारा देत राहतो. सावकार किंवा महाजन आरामात बसूनही आणखी श्रीमंत होत जातो कारण कर्ज घेणारा व्याज देत राहतो आणि भांडवलदार घरबसल्या कारखान्यात पैसे गुंतवून मालामाल होत जातो; कारण तिकडे कारखान्यात मजूरांना कमी मजुरी दिली जाते. आरामखुर्चीत बसून राहणारा आणि कधीमधी कोर्टात जाऊन भाषण ठोकणारा वकील महिन्याला हजारो रुपये कमावतो. कारण तो गरिबांना लुटून त्यांचा जमीनजुमला गिळंकृत करण्यासाठी श्रीमंतांना मदत करतो. खरी गोष्ट अशी आहे की जिथे कुठे माणूस हातपाय न हलवताही आरामात जगताना दिसतो, तिथे नक्कीच काही ना काही फसवणूक आहे, कारस्थान आहे. ह्याचा सरळ अर्थ असा की गरिबांनी उन्नती करावी असे श्रीमंतांना कधीच वाटत नाही, कारण गरीब शिकले, त्यांची प्रगती झाली तर त्यांची फसवणूक, हरामखोरी करणे अवघड होणार नाही का? जर कोणी टॅक्स दिलाच नाही तर राजे महाराजे, जज्ज, वकील कसे जगतील? जर कामगारांना लुटले नाही तर कारखान्याचे मालक आणि मॅनेजर कोट्यधीश कसे होतील? एक संस्कृत वचन आहे की, 'खाणारा आणि खाल्ला जाणारा (भक्षक आणि भक्ष्य) यांच्यात कधी मैत्री होऊ शकत नाही.' घोड्याने गवताशी मैत्री केली तर खाईल काय? वाघ आणि बकरीच्या मैत्रीबद्दल एक मिश्किल शायर म्हणतो 'बरोबर गेलेले दोघेही बरोबरच परत येतील यात काहीच शंका नाही, फक्त त्यावेळी बकरी वाघाच्या पोटात असेल.'

श्रीमंत वर्गाच्या हरामखोरीत देशभक्ती आणि धर्म असल्या गोष्टींना काही स्थान नसते. मुसलमान जमीनदाराने आपल्या मजूरांचा शेतसारा ते केवळ मुसलमान आहेत म्हणून माफ केलाय का हो? किंवा कधी हिंदू सावकाराने आपला कर्जदार हिंदू आहे म्हणून व्याज न घेतल्याचे ऐकलेय? शीख राजे-महाराजे, प्रधान, अमीर-उमराव आपल्या शीख प्रजाजनांकडून कमी कर वसूल करतात असे कधी पाहिलेय? हा शेतसारा किंवा टॅक्स वसूल करण्यासाठी ते कमी जुलूम करतात का? इंग्रज कामगारही जेव्हा झगडतात तेव्हाच इंग्रज कारखानदार त्यांचा पगार वाढवतात ना? स्कॉटलंड मधल्या जमीनदारांनी कधी आपली जमीन, जंगले लोकांमध्ये वाटून त्यांना अमेरिकेत जाण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केलाय का?

इतिहासापासून जर काही धडा मिळत असेल तर तो हाच की श्रीमंत वर्गाला 'संपत्ती' ही सर्वात प्रिय गोष्ट असते. त्यांना धर्म, देशभक्ती यापेक्षा जमीनजुमला आणि व्यक्तिगत स्वार्थ जास्त प्रिय असतात. देशभक्ती आणि धर्म या गोष्टी आपल्या जागी चांगल्या असल्या तरी श्रीमंतांच्या मानगुटीवरचे मालमत्तेचे भूत उतरवायला त्या निष्फळ ठरल्या आहेत. जगात आजवर असेच घडत आलेय आणि



जोवर मूठभर श्रीमंतांचा वर्ग संपुष्टात येत नाही तोवर हे असेच घडत रहाणार. बुद्ध, टॉलस्टॉय आणि क्रोपोटकिन सारख्या महापुरुषांनी आपली संपत्ती सोडून गरिबाचे जिणे स्वीकारले होते. पण अशा एक दोन उदाहरणांनी हा नियम बदलत नाही. त्या व्यक्ती आदरणीय असल्या तरी श्रीमंत वर्ग बेईमानी, फसवणूक अशा कोणत्याही प्रकाराने आपल्या संपत्तीचे रक्षणच करत असतो.

दुसऱ्यांच्या जिवावर मौजमजा करणारा हा वर्ग सर्व गोष्टी फक्त स्वत:च्या फायद्यासाठीच करतो. ते कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्याचे भले करणार नाहीत. कारण जगात फक्त दोनच जमाती आहेत—गरीब आणि श्रीमंत. यांच्यात एकमेकांबद्दल प्रेम आणि सहानुभूती नाही. त्यांना एकमेकांचे दृष्टिकोन समजू शकत नाहीत. दुसऱ्या वर्गाचे समजून घेणेही त्यांना अवघड जाते. सर्वसामान्य लोक अज्ञानामुळे दुसऱ्याचे विचार आणि कामाची पद्धत समजू शकत नाहीत आणि ज्यांना कळते ते वर्गावर्गातील भेदामुळे, हितसंबंधांमुळे आपल्या वर्गाच्या पलीकडचे काही समजून घेत नाहीत. आपल्याला असेही दिसते की वर्गीय विभागणी बरोबर आजूबाजूची परिस्थिती देखील श्रीमंतांना गरिबांच्या स्थितीची कल्पना येऊ न देण्यास कारणीभूत आहे. माणसाचे विचार साधारणत: त्याच्या अनुभवावर आधारलेले असतात आणि श्रीमंतांना गरिबांच्या जिण्याचा अनुभव कुठून असणार? त्यांचे विश्वच त्यांच्या वर्तुळा पुरते मर्यादित असते. आपल्या वर्गाबाहेरचे त्यांना काहीच दिसत नाही.

प्रत्येक माणसाच्या विचारांवर त्याच्या वर्गाचा मोठा प्रभाव असतो. श्रीमंतांनी कितीही आंदोलने केली तरी शेवटी ती त्यांच्याच फायद्याची ठरतात. जगातल्या प्रत्येक माणसाचे सुख, सर्वसामान्य जनतेची प्रगती या संकल्पना माहित असूनही श्रीमंत लोक आपल्या वर्गाबाहेरचे पाहूच शकत नाहीत आणि एका मर्यादित वर्तुळातच विचार करत रहातात. जगात जेवढी शक्ती या वर्गीय भेदामूळे वाया जाते तेवढी इतर कुठेही जात नाही. गरिबांना मदत करण्याच्या उच्च ध्येयाने झपाटून काही प्रामाणिक लोक मैदानात उडी घेतात. पण आत्तापर्यंतचा अनुभव असा आहे की त्यांचेही प्रयत्न अखेरीस श्रीमंतांच्याच फायद्यासाठी वापरले जातात. त्यामुळे त्यांचे समाधानही निराशेत बदलते. अर्थात बऱ्याचशा लोकांना हे कळतच नाही आणि त्यामुळे ते गरिबांसाठी काही केल्याच्या समाधानातच जगतात.

भारतातील कोणत्याही आंदोलनाचे सिंहावलोकन केल्यास या ऐतिहासिक सत्याची कितीतरी उदाहरणे सापडतील. काही चांगल्या लोकांचे थोडे प्रयत्न वगळता राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात ज्या काही चळवळी झाल्या त्यांचा फायदा शहरी, सुशिक्षित आणि पांढरपेशा लोकांनाच झाला. मला ठामपणाने असे म्हणायचेय की ज्या काही प्रगतीच्या लाटा आजवर दिसल्या त्याचा हिंदुस्थानातील सर्वसामान्य जनतेला अभावानेच फायदा झाला. कारण त्या लाटा उठवण्याचे काम उच्च वर्गातल्या लोकांनी केले होते म्हणूनच त्यांच्या प्रगतीच्या कल्पना, त्यांचे आदर्श हे त्यांच्या वर्गाच्या रंगात रंगलेले असतात. अशा प्रगतीच्या लाटा, त्या लाटा निर्माण

करणाऱ्या वर्गाचे आदर्श व कल्पना घेऊन येतात. प्रत्येक चळवळ ही ती चळवळ करणाऱ्या लोकांचा खरा अर्क असते. खालच्या वर्गातील समाजसेवा करू इच्छिणारे हे कार्यकर्ते गरीब शेतकरी आणि कामगारांमध्ये मिसळतील तर त्यांना ही गोष्ट लगेच लक्षात येईल. ते आपल्या वर्गाची दुःखं आणि त्रास समजू शकतात. त्यांचे आदर्शही त्यांच्या वर्गापुरतेच सीमित असतात. गरीब–श्रीमंतांतली दरी ते पार करू शकत नाहीत. गरीब शेतकऱ्यांनी जर आंदोलन उभे केले असते तर त्यांचे आदर्श वेगळे असते. सामान्य लोक आपल्या वर्गाच्या हिताच्या दृष्टिकोनातूनच सर्व गोष्टींकडे पाहत असतात. त्यांच्या कामाची दिशा अशी का झाली हेही ते समजू शकत नाहीत. ते खूप मोठे आदर्श घेऊन संपूर्ण जगाच्या कल्याणाच्या इच्छेने काम करायला पुढे आले असले तरीही हा वर्गीय हितसंबंधांचा दृष्टिकोन त्यांचा पिच्छा सोडत नाही. वर्गीय हितसंबंधांमध्ये जबरदस्त ताकद आहे आणि सामाजिक आंदोलनांवर तिचा फार मोठा प्रभाव आहे. इतिहासामध्ये बहुतेक गोष्टी जशा दिसतात तशा प्रत्यक्षात नसतात. मध्यमवर्गीय तत्त्वचिंतक कष्टकरी जनतेपेक्षा त्याच्या वर्गाचेच हितसंबंध चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो आणि त्यांचाच प्रचार करू शकतो.

शेतकरी आणि कामगार हेच फक्त आपल्या प्रेमाचे हक्कदार आहेत. केवळ एवढ्याचसाठी मी हा लेख लिहीत आहे. जगात संपत्ती निर्माण करणाऱ्या गरीब कामगाराकडेच मी प्रेमाने आणि आदराने बघतो.

गेल्या तीस वर्षात भारतात ज्या चळवळी झाल्या त्यांची विभागणी तीन भागात करता येईल.

(१) राजकीय (२) शैक्षणिक (३) धार्मिक.

मला असे दाखवून द्यायचेय की या आंदोलनांचा फायदा उच्चवर्गीय लोकांनाच झालेला आहे. गरिबांना त्याचा काहीही लाभ झालेला नाही.

**१) राजकीय**

राजकीय आंदोलनांनी आजवर वेगवेगळी रूपे धारण केली. त्यामध्ये समाजवादी आहेत तसे अतिरेकीही आहेत. शांततामय मार्गाने सत्याग्रह करणारे लोक जसे निर्माण झाले तसे जहाल क्रांतिकारकही निर्माण झाले. या सगळ्या धुमश्चक्रीतूनही एक गोष्ट स्पष्ट दिसते ती ही की या साऱ्याचा सामान्य जनतेला काही लाभ झाला नाही. इंडियन नॅशनल काँग्रेस हा मध्यमवर्गीय लोकांचा छानसा पक्ष आहे. त्यांच्या मागण्याही त्याच वर्गातील लोकांसाठी आहेत. काँग्रेस आजवर कधीच शेतकरी आणि कामगारांना बरोबर घेऊन आपली धोरणे ठरवू शकलेली नाही. काँग्रेसमध्ये पदवीधर, वकील, प्राध्यापक, व्यापारी हेच लोक सामील असल्याने त्यांची ध्येयधोरणे आणि कार्यक्रमही त्यांच्याच मर्जीप्रमाणे ठरतो. एक आंदोलन एकाच वेळी श्रीमंत आणि गरीब अशा दोन्ही वर्गांच्या हितासाठी काम करू शकत नाही. असे घडणे अशक्यप्राय आहे. भारतात आपल्याला एक खास हिस्सा असायला हवा अशी काँग्रेसची मागणी आहे. हा हिस्सा त्यांना कसा मिळेल? ज्या



प्रकारच्या मागण्या काँग्रेस करत आहे त्यांच्या पूर्ततेमुळे कोणाचा फायदा होईल? सरकारी नोकऱ्यांमध्ये भारतीयांना हिस्सा हवा असेल तर तो कुणाला मिळेल? नक्कीच शेतकरी कामगारांना तर त्या नोकऱ्या मिळणार नाहीत. 'इंडियन सिविल सर्व्हिस' मध्ये काही भारतीयांना जागा मिळाल्याने शेतकरी–कामगारांना शिक्षण, पौष्टिक अन्न, निवारा हे तर सोडाच पण त्यांना अगदी जरुरीच्या गोष्टी सुद्धा मिळणार नाहीत. आपल्या कमाईचा एक मोठ्ठा हिस्सा कर स्वरूपात कापला जातो तो लुटून नेणाऱ्यांमध्ये किती परदेशी आहेत आणि किती भारतीय याच्याशी त्या गरीब शेतकऱ्याला बिचाऱ्याला काय घेणे देणे? मालमत्तेमध्ये मुल्ला मौलवी आणि साधू संन्याशांना पण हिस्सा मिळतो. ते तर याच प्रदेशातले आहेत. 'देशातल्या सरकारी नोकरांचे पगार हवे तर कमी करा पण शेतकऱ्यांचा कर कमी करा'–अशी मागणी काँग्रेसने केली आहे कधी? मग सामान्य जनतेला त्यांच्या आंदोलनाशी का घेणे देणे असावे?

खरेतर अशा मागण्या करणाऱ्या चळवळी मध्यमवर्गीयच उभारू शकतात. कारण त्यांना आपल्या मुलांचे भविष्य उज्ज्वल करायचे असते. वकिलांचे डोळे नेहेमी न्यायाधीशपदाकडे लागलेले असतात. पदवीधर तरुण सरकारी नोकरी करणाऱ्या रावसाहेबांकडे पाहून लालचावलेले असतात आणि अशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मध्यमवर्गीयांच्या या मागण्या आहेत आणि त्यांनी मध्यमवर्ग म्हणजेच देश व जनता आहे असे समजायला सुरुवात केली आहे.

काँग्रेसवाले नेहमी ओरडत असतात की पंजाब कौन्सिल आणि असेंब्लीमध्ये भारतीयांची संख्या वाढायला हवी. यामुळे सामान्य भारतीय माणसाला काय फायदा होईल? कौन्सिलमध्ये कोण निवडून जातात? आणि हे निवडून येणारे लोक त्याचा फायदा उठवत नाहीत का? त्यातील सेवेचा ते मोबदला मागत नाहीत? ही गोष्ट मोठ्या प्रतिष्ठेची व अभिमानाची समजत नाहीत का? 'सन्माननीय' सदस्य म्हणवून घेणे आणि लोकांनी सन्मानाने 'शहीद' म्हणणे यात कितीतरी फरक आहे. कौन्सिलचे सदस्य होण्याने जीवन कठीण होते की त्या उलट? हे प्रश्न विचारले गेले पाहिजेत आणि त्यांची उत्तरेही मागायला हवीत.

कौन्सिलमुळे खरेच काय फायदा होईल हा विचार बाजूला ठेवून जरी पाहिले तरी हे स्पष्ट दिसेल की ज्यांना त्यापासून काही फायदा होण्याची आशा आहे अशांच्या सुपीक डोक्यात फक्त हा विचार येईल. कौन्सिलवर एक–दोन वकील किंवा सावकार निवडले गेल्याने कोट्यवधी कष्टकरी जनतेच्या आयुष्यात असा काय फरक पडेल? त्या लोकांचे कर कमी होणार आहेत? का त्या लोकांवरचे पोलीस तहसीलदारांचे अत्याचार कमी होणार आहेत? दुष्काळ–महामारी नष्ट होणार आहे? या लोकांसाठी कुणी गावोगावी स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवणार आहे? का गावागावात शाळा आणि वाचनालये निघणार आहेत? २–४ भारतीयांना कौन्सिलमध्ये स्थान मिळण्याने यापैकी काहीही होणार नाही. हां, काही सुशिक्षित लोक त्यातून पैसे

कमावतील, त्यांची प्रतिष्ठा वाढेल आणि ऐटीत इकडे तिकडे फिरू शकतील. सगळ्या गरीब जनतेवर आपला अधिकार गाजवतील. काही शहाण्यासुरत्या लोकांना हे समजते की समाजसुधारणेचा हा रस्ता बरोबर नाही पण त्या बिचाऱ्यांना हे लक्षात येत नाही की हा रस्ता आखला कुणी! खरे तर त्यांनी फक्त हे लक्षात घ्यायला हवे की हा सगळा मध्यमवर्गीय स्वप्नांचा अर्क आहे आणि शेतकरी कामगारांना त्यापासून काहीच लाभ नाही. मग सारे चित्र अगदी स्पष्ट होईल.

अशा प्रकारे हे स्पष्ट दिसते की या चळवळींच्या यशामुळे मध्यमवर्गातील लोकांनाच लाभ होतो. त्या चळवळींनी कधी पटकी किंवा प्लेगसारख्या आजारांचा बंदोबस्त करायचा प्रयत्न केला नाही, कधी शेतसारा, कर कमी करण्याचा किंवा लोकांसाठी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी झगडा केला नाही. बिचाऱ्या गरीब शेतकरी–कामगाराला सिविल सर्व्हिस किंवा पंजाब कौन्सिलचा काय फायदा होणार आहे? त्याला ना प्रतिष्ठा हवी ना दिखाऊ पदं! त्याला हवी आहे भाकरी; हवे आहे आरोग्य आणि हवे आहे स्वातंत्र्य! परंतु काँग्रेसने याकडे कधी लक्षंच दिले नाहीये. हां, त्यांनी बरेचसे प्रस्ताव पास केले, पण त्याने काय होणार? या मध्यमवर्गीयांना कशात रस आहे ते सरकारलाही चांगले माहीत आहे. स्वत:ला फायदा होईल अशा काही मामुली सुधारणा पदरात पडल्या की हे लोक खूष होतील हेही सरकार जाणून आहे. या लोकांना खेड्यात माणसांचे काय हाल होत आहेत त्यांच्याशी काही घेणे–देणे नाहीये. त्यामुळे सरकार या लोकांना कौन्सिलमध्ये सरकारी नोकऱ्यांमध्ये काही जागा देऊन जन आंदोलने थांबवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे त्या चळवळीत सामील असणाऱ्या काही प्रामाणिक व्यक्तींचे प्रयत्नही मध्यवर्गीयांच्याच फायद्याचे ठरतात, शेतकरी कामगारांना त्याचा काहीच लाभ होत नाही.

ही गोष्ट आणखी व्यवस्थित समजण्यासाठी मी असे म्हणेन की शेतमजुरांच्या हक्कांचा विचार करून पाहा. सगळे राजकीय पक्ष जमीनदारांच्या बाजूने त्यांच्या हक्कांसाठी आंदोलने करतात. पण शेतमजुरांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्याची कधीच हिम्मत करत नाहीत. खरे तर आपल्या देशात बहुसंख्य शेतमजूर जमीनदारांचे अत्याचार, शेतसारा आणि इतर करांखाली पिचत आहेत.

ज्या चळवळी आपल्या ध्येय धोरणांमध्ये हा विषय अग्रक्रमाने घेत नाहीत आणि त्यासाठी आंदोलनाचा कार्यक्रम आखत नाहीत त्या चळवळी सामान्य लोकांसाठीच्या असूच शकत नाहीत आणि यामध्ये काँग्रेसला दोषी ठरवण्यात काही अर्थ नाही, कारण ते आपल्या सदस्यांव्यतिरिक्त इतरांकडे फारसे लक्ष देऊ शकत नाहीत. चप्पल घालणाऱ्यालाच ती कुठे टोचते ते कळते. कमाईतला बराचसा वाटा शेतसारा म्हणून द्यावा लागत असल्याने जीवन किती दु:खी कष्टी होते हे एखादा शेतकरीच समजू शकतो. सुशिक्षित, शहरी मध्यमवर्गातल्या लोकांना काय खाक अंदाज येणार त्याचा !



### २) शैक्षणिक चळवळी

मी स्पष्टपणे असे म्हणेन की शेतकऱ्यांची काँग्रेस असती तर तिचे प्रस्ताव या काँग्रेसच्या प्रस्तावापेक्षा खूपच वेगळे आणि नव्या प्रकारचे असतील आणि तिच्या मागण्याही अगदी वेगळ्या असतील. राजकीय चळवळींमध्ये आपल्या देशाने अनेक बलिदाने पाहिली, अनेक लोकांचे बहुमूल्य प्राण गमावले. पण शैक्षणिक चळवळींमध्ये तर आपली खूपच जास्त ताकद वाया गेली आहे आणि बऱ्याचशा प्रामाणिक, मेहनती स्त्री–पुरुषांची आयुष्ये खर्ची पडली आहेत. पण या चळवळींचाही परिणाम निराशाजनकच आहे, कारण इथेही मध्यमवर्गीयांचाच फायदा झाला आहे. आपल्या अनेक नेत्यांनी शहरामध्ये वेगवेगळ्या जाती–बिरादरींच्या तर्फे शाळा, कॉलेज उघडली. पण आपण हे विचारू शकतो का की शाळा–कॉलेज उघडण्याचा विचार त्यांच्या मनात कसा काय आला? आणि हेही विचारा की त्यांनी आपले हे काम खेड्यांमध्ये जाऊन का नाही केले? त्यात खर्चही कमी आला असता आणि फायदा जास्त होता. वकील आणि कारकून निर्माण करण्याचे ध्येय का ठेवले आहे त्यांनी? आणि हिंदू मुसलमानांसाठी वेगवेगळी विद्यापीठे का? आम्हाला तर असे दिसते की हे लोकही आपल्या हितसंबंधांच्या छायेखालीच सगळी कामे करत आहेत. पंजाबमधील आर्य समाजाचे उदाहरण घेऊन पाहू.

स्वामी दयानंदांच्या शिष्यांना सरकारी विद्यापीठात सामील होणारे आणखी एक कॉलेज का बरे हवे आहे? किती विसंगती आहे! कुठे स्वामी दयानंदांचे आदर्श आणि कुठे सरकारी विद्यापीठ आणि त्यातील कॉलेज. पण तरीही हे असे का झाले? कारण स्पष्ट आहे. आर्य समाजाच्या उपासकांमध्ये बहुसंख्य वकील आणि पदवीधर असे मध्यमवर्गीय लोकच आहेत. जर त्यामध्ये संस्कृत शिकणाऱ्या पंडितांचा भरणा असता तर त्यांनी स्वामी दयानंदाच्या स्मृतीसाठी वेगळेच काहीतरी केले असते आणि ते उपासक जर गरीब शेतकरी असते तर त्यांनी गरिबांसाठी कॉलेज उघडले असते किंवा त्यांच्या दृष्टीने आणखी एखादी वेगळी जास्त महत्त्वाची गोष्ट केली असती. समाजात सगळ्या शिक्षणसंस्था मध्यमवर्गीयांच्या मुलांनी शिकून मोठे व्हावे यासाठीच उघडल्या गेल्या आहेत. दक्षिणेमध्ये अनेक देशभक्तांनी शिक्षणासाठी मोठे त्याग केले, पण कुणाच्या शिक्षणासाठी? फर्ग्युसन कॉलेजने मध्यमवर्गातील हजारो नवयुवकांना शिक्षण दिले, चरितार्थाच्या आणि स्वत:च्या प्रगतीच्या संधी उपलब्ध करून दिल्या, पण शेतकऱ्यांच्या मुलांसाठी त्यांनी काय केले? या कॉलेजमधून बाहेर पडणारे वकील आणि प्राध्यापकही शेतकऱ्यांच्या जिवावरच चैन करतात ना? तेही शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या वर्गातच सामील होतात. सामान्य लोक देशभक्तांची बलिदाने, त्यांची मेहनत याचा फायदा घेऊ शकत नाहीत. या देशभक्तांनी मध्यमवर्गीयांमध्ये आपले आयुष्य खर्च करण्यापेक्षा पूर्वीच्या साधू संन्याशांप्रमाणे गरीब आणि सर्वसामान्य जनतेमध्ये जाऊन रहाणे अधिक उचित ठरले नसते का? हा खूप महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याला नजरेआड करून चालणार नाही.

जगातल्या प्रत्येक माणसाच्या भल्यासाठी काम करू इच्छिणाऱ्या ध्येयवादी तरुणांना मी सांगू इच्छितो की मध्मवर्गाचा स्वार्थ आपल्या कामाच्या आड येऊ देऊ नका. सरळ सामान्य, गरीब लोकांमध्ये जा. स्वत: मध्यमवर्गीय असल्याने त्याच वर्गासाठी काम करत रहाणे आणि आपण लोकांसाठी काही करतो आहोत यात समाधान मानणे हे सहज होऊ शकते. मला असे वाटते की तरुणांनी ह्या धोक्यापासून सावध राहावे.

स्त्रीशिक्षणाबद्दलचा आरडाओरडाही मध्यमवर्गाचा मामला आहे. कन्याशाळांमध्ये गरीब शेतकऱ्यांच्या किती मुली शिक्षण घेत आहेत? खरे तर खेड्यांमध्ये हा प्रश्नच अजून पोहोचला नाहीये कारण तिथे तर पुरुषही अशिक्षित आहेत. शहरी सुशिक्षित तरुणांना सुशिक्षित सहचरी हव्यात, या गरजेतूनच हा प्रश्न पुढे आला आणि त्यामुळे मध्यमवर्गीय लोकांची घरे आणखी सुखी बनली. पण अशा काही सुखी घरांमुळे सामान्य लोकांची परिस्थिती कशी सुधारेल? मूठभर लोकांच्या प्रगतीमुळे शेतकरी–कामगारांना काहीही मिळणार नाही. या शैक्षणिक चळवळी जर सर्वसामान्यांसाठी असत्या तर खेड्यांमधे शाळा उघडणे हे त्यांचे मुख्य काम झाले असते कारण कोणत्याही प्रदेशामध्ये प्राथमिक शिक्षण हे लोकजागृतीचे पहिले पाऊल आहे. आपल्यालाही आपल्या देशाच्या प्रगतीसाठी सुरुवात तिथूनच करावी लागेल.

**३) धार्मिक आणि बंधुभाव वाढवणाऱ्या चळवळी**

आजकाल आपल्या देशात अनेक धार्मिक तसेच सर्व धर्म समभावाच्या चळवळींनी जोर पकडला आहे आणि ही देखील मध्यमवर्गीय लोकांच्या डोक्यातलीच कल्पना आहे. उदारणार्थ स्त्रियांच्या पडद्याचा प्रश्न घेऊ. मजूर महिला तर दिवसभर डोक्यावरून पाट्या वहात असतात किंवा शेतात काबाडकष्ट करून कसेबसे आपले पोट भरत असतात. त्यांच्यापुढे हा पडद्याचा प्रश्न कुठून येणार! मध्यमवर्गीय लोकांच्या आरामशीर आयुष्यांमध्येच असले प्रश्न येऊ शकतात. अशा सद्भावनापूर्ण चळवळींची एक–एक उदाहरणे तपासून पाहिली तर सगळी याच प्रकारची आहेत असे आढळेल.

शेवटी मी फक्त एवढेच म्हणेन की ज्या तरुणांना जगात काही काम करायचे आहे, जे लोकांसाठी काही करू इच्छितात, त्यांनी भारतातील गरीब शेतकरी, कामगारांमध्ये जाऊन त्यांचे हित कशात आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करावा. त्यांचे कष्ट, त्यांची दु:खं दूर करून त्यांची उन्नती कशात आहे या विचाराने काम करावे, त्यासाठी आंदोलने करावीत. मी सर्वसाधारणपणे वर्तमान काळातील आंदोलनांचा आढावा घेत असताना एका खास ध्येयाकडे लक्ष वेधले आहे. त्यात सामील असणाऱ्या प्रामाणिक तरुणांनी त्यामुळे नाराज होऊ नये. मला त्यांचा प्रामाणिकपणा आणि सहानुभूती यांच्याबद्दल आदर आहे तरीही या दोषाकडे त्याचे लक्ष वेधणे मी माझे कर्तव्य समजतो.

***



***"ज्या दिवशी मानवसेवा आणि मानवमुक्तीला सर्वात महत्त्वाचे समजून त्यासाठी स्वत:चे आयुष्य वाहून घेणारे असंख्य लोक तयार होतील, ती स्वातंत्र्याची पहाट ठरेल. जेव्हा हे लोक राजा बनायला किंवा मृत्यूनंतर पुढल्या जन्मी स्वर्गात जाऊन काही प्राप्त करायला नव्हे, तर मानवतेच्या मानगुटीवरील गुलामीचे जोखड उखडून फेकण्यासाठी आणि स्वातंत्र्य व शांततेच्या प्रस्थापनेसाठी, शोषकांना, जुलूम व दडपशाही करणाऱ्यांना आव्हान देण्यासाठी प्रेरित होतील, तेव्हाच ते अशा मार्गावर चालू लागतील, जो मार्ग त्यांच्या स्वत:साठी जरी धोकादायक असला तरी त्यांच्या स्वत्वासाठी एकमेव गौरवपूर्ण मार्ग आहे."***

*–भगतसिंगाने ५–६ ऑक्टोबर १९३० ला जेल मधून लिहिलेल्या व प्रथम २७ सप्टेंबर १९३१ ला 'द पीपल' या इंग्रजी पत्रात प्रसिद्ध झालेल्या लेखामधून.*

***"क्रांतीचा आमच्यासाठी अर्थ आहे–अन्यायावर आधारित सध्याच्या समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल.***

***समाजाचे मुख्य अंग असूनही कामगारांना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवले जातेय आणि त्यांच्या निढळाच्या घामाच्या कमाईतील सारा वाटा शोषक भांडवलदार लुबाडताहेत. साऱ्या अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याचे कुटुंब आज एकेका दाण्यासाठी मोताद झाले आहे. साऱ्या दुनियेला वस्त्रांनी मढवणारा विणकर स्वत:ची व आपल्या कच्च्या-बच्च्यांची लाज झाकण्याइतपत कापडाचा तुकडा कमवू शकत नाही. सुंदर महाल उभारणारे गवंडी, लोहार व सुतार स्वत: बकाल गलिच्छ वस्त्यांमध्येच जीवन कंठतात. उलट समाजातले मूठभर शोषक भांडवलदार किरकोळ गोष्टींसाठी लाखो रुपयांची उधळपट्टी करतात.***

***ही भयानक विषमता व बळजबरीने लादलेला भेदभाव जगाला एका प्रचंड उलथापालथीकडे नेत आहे.ही अवस्था फार काळ टिकून राहू शकत नाही."***

*–असेंब्ली बॉम्ब खटल्यात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी दिल्लीच्या सेशन्स कोर्टात दिलेल्या ऐतिहासिक साक्षीमधून.*